# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. ३०/०३/२०१५**

आज सोमवार दि. ३०/०३/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ९ दि. १८/०३/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सामंत प्रमोद जयराम | विरोधी पक्षनेता |
| ६) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १५) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १६) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १७) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १८) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १९) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २०) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २१) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २२) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २३) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २६) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २७) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २९) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३०) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३२) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३३) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३५) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३६) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३७) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३८) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३९) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४०) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४१) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४२) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४३) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४४) | संदिप मोहन पाटील | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४५) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४६) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४७) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४८) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४९) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५०) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५१) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५२) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५३) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५५) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५६) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५७) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५८) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५९) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६०) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६१) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ६२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६३) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६४) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६५) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६६) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६७) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६८) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६९) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७१) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७२) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७३) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७४) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७५) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७६) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७७) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७८) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७९) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८०) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८१) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ३) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६) | म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| ७) | प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |
| ८) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| २) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ४) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |

**मा. महापौर :-**

मा. सर्व सदस्यांना अर्थसंकल्पाची प्रती प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने अर्थसंकल्पातील जमा व खर्चाचा वेध घेवून साधकबाधक चर्चा करुन अर्थसंकल्प सर्वानुमते मंजूर होईल अशी अशा बाळगते.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सोमवार दि. ३०/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०९, दि. १८/०३/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९४, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७१, ठराव क्र. १६० ) मी मा. सभापती श्री. प्रशांत केळुसकर यांना विनंती करतो की त्यांनी स्टेजवर येऊन मूळ बजेट मा. महापौर यांना सादर करावे. कृपया मा. सभापती, स्थायी समिती यांनी डायसवर यायचे आहे.

**मा. सभापती :-**

मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेते, मा. आयुक्त, उप-आयुक्त, सन्मा. नगरसेवक/नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी वर्ग, सभागृहात गॅलरीत उपस्थित मिरा भाईंदर शहरातील नागरीक व पत्रकार बंधुनो, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये सन २०१४-१५ चे सुधारीत व २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक आपणासमोर सादर करीत आहे. दि. ०४ मार्च २०१५ रोजी मा. आयुक्तांनी मा. स्थायी समितीस सादर केलेल्या अंदाजपत्रकावर मा. स्थायी समितीमध्ये चर्चा होऊन अपेक्षित उत्पन्नात विभागवार आढावा घेवून उत्पन्न वाढ सुचविण्यात आलेली आहे. त्यानुसार वाढीचे उत्पन्न हे विकास कामांसाठी वर्ग करण्यात आलेले आहे. या अंदाजपत्रकात शहरास नेहमीच भेडसावणारी पाणी समस्या यासाठी नविन ७५ द.ल.लि. पाणी योजना यावर्षी सुरु करण्यात येत आहे. यासाठी शासन अनुदान, मनप स्वनिधी तसेच कमी पडणारा निधी कर्जाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. याचबरोबर शहरवासियांसाठी नविन उद्याने, डि.पी. रोड, नविन अग्निशमन केंद्र व अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. याशिवाय नविन रस्ते, हॉस्पीटल बांधकाम,घनकचऱ्याचे व्यवस्थापन, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावरील अश्वारुढ श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे सुशोभिकरण, मार्केट बांधकाम इ. नाविण्यपूर्ण कामे या अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आलेली असून शहरातील सांडपाण्याचा पुर्नवापर प्रकल्प हाती घेऊन हे पाणी कारखाने, उद्याने, इमारत बांधकामासाठी वापरण्यात येणार आहे. सुरु असलेल्या योजना पूर्ण करणे, तसेच नविन योजना देखील मुदतीत पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकातील नविन योजनांचा लवकरात लवकर शहरवासियांना लाभ मिळेल, अशी प्रशासनाकडून अपेक्षा करतो. मा. स्थायी समितीने मंजूर करुन मा. महासभेस सादर केलेल्या सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रकास मा. महासभेची एकमताने मंजूरी मिळावी ही विनंती. अंदाजपत्रकावर विचार विनिमय करताना मा. स्थायी समितीचे सर्व सदस्य, मा. आयुक्त, उपायुक्त, विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व लेखा विभागाचे मोलाचे सहकार्य लाभले, या सर्वांचे मी आभार मानतो.

**मा. महापौर :-**

आजच्या अर्थसंकल्पीय सभेमध्ये सर्व सदस्य, मा. आमदार श्री. नरेंद्र एल. मेहता, मा आयुक्त, सर्व अधिकारी, पत्रकार बंधु, प्रेक्षागृहामध्ये उपस्थित असलेले नागरीक यांचे मनःपुर्वक स्वागत. मा. स्थायी समिती सभापती, श्री. प्रशांत केळूसकर यांनी सन २०१४-१५ चे सुधारीत व २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक अंतिम मंजूरीकरीता सभागृहात सादर केले आहे, त्याबद्दल त्यांचे व सर्व पक्षिय स्थायी समिती सदस्य व प्रशासनाचे मी आपल्या सर्वांच्या वतीने आभार व्यक्त करीत आहे. मी महापौर पदाचा पदभार घेतल्यानंतरचा पहिलाच अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्प बनविणे हे केवळ जमा खर्चाचे विवरण पत्र तयार करण्याची पक्रिया नसून शहराच्या विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी महानगरपालिकेच्या संपूर्ण आकडेमोडीच्या विश्लेषणाबरोबरच समाजतील सर्व घटकांचा एकत्रित अभ्यास करुन ध्येय धोरणे निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करताना सर्वसामान्य नागरीकांना सुलभ व सहजरित्या महानगरपालिकेच्या सेवा सुविधा उपलब्ध करण्यासाठी तयार केलेली प्रणाली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्वसामान्य नागरीक नजरे समोर ठेवून त्यांना अधिकाधिक व चांगल्या प्रकारच्या नागरी सुविधा कशा देता येतील याचा अंतर्भाव या अर्थसंकल्पात केलेला आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजना |
|---|---|
| १ | नविन फ्लायओव्हर बांधणे |
| २ | कम्युनिटी हॉल बांधणे |
| ३ | नविन मार्केट बांधणे व विकसित करणे |
| ४ | मिरारोड सुशोभिकरण करणे |
| ५ | मिरारोड स्टेशन पार्कींग सुविधा उपलब्ध करणे |
| ६ | नाट्यगृह बांधणे |

| | |
|---|---|
| ७ | ई-लायब्ररी तयार करणे |
| ८ | शहरामध्ये वाय-फाय सेवा उपलब्ध करुन देणे |
| ९ | उद्याने व मैदाने विकसित करुन देणे. |
| १० | टेंभा हॉस्पीटल सुविद्य सोयींनी चालू करणे. |
| ११ | नागरीकांना अद्यावत अशी परिवहन सेवा चालू करुन देणे त्यामध्ये एकूण २० मिनि बसेस, १० वॉल्वो बसेस तसेच ७० मोठ्या बसेसचा समावेश आहे. |
| १२ | ७५ एम.एल.डी. पाण्याची योजना कार्यान्वीत करणे. |
| १३ | शाळा बांधकाम करणे. |
| १४ | कॉक्रींट रस्ते बांधणे. |
| १५ | घोडबंदर किल्ल्याचे सुशोभिकरण करणे. |
| १६ | रस्त्यांचे रुंदीकरण करणे. |
| १७ | स्मशानभूमी, दफनभूमी, विकसित करणे. |
| १८ | स्केटींग कोर्ट तयार करणे. |
| १९ | तरण तलाव बांधणे. |
| २० | स्पोटर्स कॉम्प्लेक्स अद्यावत सोयींनी सुसज्ज करणे. |
| २१ | अंध अपंग महिलांसाठी विशेष योजना राबविणे. |
| २२ | नविन फायर स्टेशन बांधकाम यामध्ये २१ व्या मजल्यापर्यंत शिडीची व्यवस्था करणे. |

वरील सर्व योजना आम्ही वेळेत पूर्ण करणार आहोत. या अर्थसंकल्पामध्ये एक अभिनव योजना या आर्थिक वर्षापासून आम्ही सुरु करत आहोत. **"भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना"** या नावाने महानगरपालिकेतील कोणत्याही एका वॉर्डाची निवड केली जाईल व या वॉर्डामधील सर्व प्रकारची कामे वर्षभरामध्ये पूर्ण करण्याचा संकल्प राहील. या वार्डाकरीता खास निधी रु. १० कोटी इतका असेल. शहरास होणारा अपुरा पाणी पुरवठा लक्षात घेता युती सरकारने व स्थानिक आमदार मा. नरेंद्र एल. मेहता, श्री. प्रताप सरनाईक यांनी पाणी समस्येबाबत योग्य तो पाठपुरावा करुन रु. २६९.६२ कोटींची योजना सरकारकडून मंजूर करुन घेतलेली आहे. यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील पाणी समस्या दुर होण्यास मदत होणार आहे. महानगरपालिकेतील प्रत्येक नागरीकाला महानगरपालिकेसंबंधी माहिती मिळणेकरीता व कामात पारदर्शकता आणणे करीता कार्यालयीन कामांमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या करीता कार्यालयीन कामकाजात गतिमानता आणण्याकरीता ई-ऑफीस प्रणाली आणून त्याची अंमलबजावणी करण्याचा मानस आहे. महानगरपालिकेच्या मर्यादीत उत्पन्नातून शहरवासियांना मुलभूत सेवा पुरविणे, तसेच सर्व प्रभागातील विकास कामे करणे, त्यानुसार अर्थसंकल्प बनविणे अत्यंत कठीण काम असते. तरी देखील कुठल्याही प्रभागावर अन्याय होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे. सुरु असलेल्या योजनांची पुर्तता, मुलभूत सेवा पुरविणे, तसेच नविन योजना अंमलात आणणेसाठी आपल्या सर्वांचे मोलाचे सहकार्याची अपेक्षा करते. धन्यवाद!

**प्रमोद सामंत** :-

मा. महापौर मॅडम, आज आपण २०१५-१६ बजेट सादर केलेले आहे. १३६४ कोटीचा बजेट आहे. गेल्या वर्षाचे बजेट ७५२ कोटीचे होते १३६४ आणि ७५२ म्हणजे ५० टक्केची वाढ. मा. महापौर मॅडम हा जो बजेट केला आहे तो अतिशय फुगवलेला दिसतो. विकास कामांना कोणताही विरोध नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, विषय सोडून बोलतात पहिला वृक्ष प्राधिकरणचे बजेट आहे ज्यावेळी बजेट येईल त्यावेळी चर्चा करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

संपूर्ण बजेटची चर्चा आली पाहिजे. सर्व बजेट सादर केलेले आहे. त्याच्यामुळे पूर्ण बजेटवर चर्चा करायची आहे.

**मा. महापौर :-**

आपण जसा विषय घेणार त्यावर तुम्ही बोला सगळ्यांना भेटणार पहिला बजेट आहे त्यावर तुम्ही बोला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बजेट सादर झाल्यावर संपूर्ण बजेटवर चर्चा होते आणि पुर्ण बजेट तुम्हाला सभापतीने सादर केलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

ही प्रथा आपणच काढली आहे.

**मा. महापौर :-**

वृक्ष प्राधिकरणवर काही बोलायचे असेल तर बोला.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही हरकत घेतली होती कारण तो विषय नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमची पण हरकत आहे तुम्ही सर्व बजेटवर चर्चा करा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, विरोधी पक्षनेत्यांनी आक्षेप घेतला आहे की, मागच्या वर्षी जे बजेट होते ७५२ कोटीचे आणि आता १३६४ कोटीचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक विचारात घेऊन मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या / फेरबदल करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेले अंदाजपत्रक स्विकारुन आजची ही मा. विशेष महासभा अंदाजपत्रकास मंजुरी देत आहे.

**(आकडे लाखात)**

| तपशिल | 2014-15 (सुधारित अंदाज) | 2015-16 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 263.96 | 290.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 1381.04 | 1855.00 |
| एकूण खर्च | 1645.00 | 2145.00 |

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही बजेटची मिटींग आहे. मा. आयुक्त साहेब मिटींगला गैरहजर आहेत आणि आयुक्त साहेब पाहिजेत. त्याचा खुलासा करावा की आयुक्त साहेब का नाहीत.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, मा. आयुक्तांना ऐनवेळी लक्षवेधी लागलेली आहे आणि त्यासाठी विधानभवन वरुन बोलावले असल्यामुळे ते तिकडे गेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही महासभा महत्वाची नाही का? पूर्ण वर्षाचा बजेट आपण सादर करतो आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.) :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार मा. आयुक्तांच्या वतीने जे उपायुक्त हजर राहतात त्यांना आयुक्तांचे सर्व अधिकार असतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पूर्ण अधिकार असतात हे आम्हाला माहित आहे. परंतु आयुक्तांना ही मिटींग अटेंड करणे आवश्यक होते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला या विषयावर काही बोलायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी विषयावरच बोलत आहे. ही महासभा आहे. खेदाची बाब आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हाला विषयावर बोलू द्या. सत्ताधारी पक्षाचा हा पहिलाच बजेट आहे. ह्या बजेटमध्ये संत ज्ञानेश्वरांची एक ओवी आहे. त्याच्यात त्यांनी म्हटले होते कणीस जरी दिसायला मोठे असले तरी त्याच्या आतमध्ये दाणे नसतात. त्याप्रमाणे तुमचा बजेट फुगीर आहे पण आतमध्ये काही नाही. लोकांना उल्लू बनवण्यासाठी हे बजेट काढलेले आहे. हे सर्व चुकीचे आहे. तुम्ही आता वृक्षप्राधिकरणाचे बोललात.

**शरद पाटील :-**

तुम्ही या नागरिकांची माफी मागावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वृक्षप्राधिकरणामध्ये प्रशासनाने ३० करोड बजेटची तरतूद केली आहे. आपल्या स्थायीमध्ये १८.५० तरतूद केली आहे. ही चुकीची बाब आहे. पर्यावरणाकरिता झाडे लावायची आहे आणि जगवायची आहेत. महापालिकेने व्यवस्थितपणे केले. आज एवढी मोठी बचत केली परंतु आपल्या सभापतींनी बजेट तरतूद कमी

केली ही चूकीची बाब आहे. त्याच्यामुळे ही बजेट वाढली पाहिजे ही १८.५० कोटीची बजेट ३० करोड झाली पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

या शहराच्या इतिहासाचा दिवस आहे. २०१४-१५ मूळ आणि २०१५-१६ अंदाजे सुधारित व मूळ अंदाजपत्रक यांच्या चर्चेसाठी ही विशेष महासभा बोलाविण्यात आलेली आहे. खर तर ही चर्चा चांगल्या वातावरणामध्ये घडली पाहिजे. ज्यांना बोलायचे आहे त्यांनी शांततेने उभे राहून बोलले पाहिजे. प्रत्येकाला ऐकू येईल काय चर्चा चालु आहे ते समजुन येईल. सुरुवात एक चांगला दिवस उगवला आहे म्हणून एक चांगल्या दिशेने मी त्याची सुरुवात करणार आहे. ऊंगलीयाँ थक गई, पत्थर तराशते तराशते, जब सुरत बनी यार की तब खरीददार आ गए। खर तर वृक्ष प्राधिकरणचा हा बजेट अर्थसंकल्प सादर केलेला आहे. ठराव झालेला आहे मात्र फक्त वृक्ष प्राधिकरणाविषयी नाही हा एक विभाग आहे आणि तो पालिकेचा विभाग आहे म्हणजे त्याचा कोठेतरी परिणाम मूळ अंदाजपत्रकावर होणारच. कुठेतरी वाढ आणि घट केल्यानंतर त्याचा डायरेक्ट परिणाम मुळ अंदाजपत्रकावर पडतो. आणि त्याचा चुकीचा प्रभाव व त्यांची खर्चिक प्रभाव या शहरावर पडेल. आज जेवढे कागदपत्र सादर करण्यात आलेले आहेत त्याच्यामध्ये बरेच सुधारणा वाढ, घट, कमी-जास्त कुठल्या विभागाला पैसे जास्त लागलेले त्याला जास्त दिले. कमी लागले तर कमी दिले मात्र, उत्पन्नाच्या बाजुला गृहित धरुनच करण्यात आलेले आहे. सरासरी कधीच काहीच करण्यात आलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

यांचेही सन्मा. सदस्य स्टँडिंगमध्ये डोळ्यात तेल घालुन काम करित होते. हे अंधारातल अंदाजपत्रक नाही. सन्मा. सदस्य आणि त्यांचे सदस्य पक्षनिहाय स्थायी समितीमध्ये आहेत त्यांनी जे काही सुचवले.

**सुहास रकवी :-**

त्यांनी जे काही चुकीचे सांगितले आहे काही ठिकाणी आमचा आक्षेप आहे तो नोंदवला नाही. ते तुम्ही लिहून घेतलेल नाही. त्यावेळेला डोळ्यात तेल नाही आम्ही त्यावेळेला समाजाचा आणि या शहराचा विकास करण्याकरिता जे शक्य होईल त्याच्याकरिता सहकार्य केलेले आहे.

**मा. महापौर :-**

सगळ्यांना मी विनंती करित आहे विषयाला धरुन बोला.

**जुबेर इनामदार :-**

विषयाला धरुनच आहे.

**मा. महापौर :-**

नाही, हे विषयाला धरुन नाही.

**जुबेर इनामदार :-**

अर्थसंकल्पातला वृक्ष प्राधिकरण विभाग किंवा वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक त्यांच्या मुळ अंदाजपत्रकावर प्रभाव आहे का नाही त्याला तर तुम्ही सांगु शकत नाही.

**मा. महापौर :-**

आता माझी विनंती राहणार.

**जुबेर इनामदार :-**

मालमत्ता कर भाडे कर तेव्हा जाऊन मालमत्ता करामध्ये वाढ दाखवली म्हणजे त्याचा परिणाम वृक्ष प्राधिकरणाच्या महसुलीवरती सुध्दा पडतो याचा अर्थ काय झाला. याच्यामुळे अंदाजपत्रकामध्ये जी काही वाढ केलेली आहे. त्याच्यानंतर ते त्याच्यामधल्या सुधारणा लक्षात घेऊनच त्यांच्यामधले वृक्ष प्राधिकरणमध्ये जाईल. २०११-१२, २०१२-१३ मध्ये १६ टक्के कमी उत्पन्न दर्शविण्यात आले होते. २०१३-१४, २०१४-१५ मध्ये............
(सभागृहात गोंधळ)

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त महोदय आज नाही आहेत. उपआयुक्तांनी सांगितले आहे की, आयुक्तांचे अधिकार मा. उपायुक्तांना आहेत हे आम्हाला माहित आहे. परंतु आजच्या बजेटच्या मिटींगला मा. आयुक्त महोदय पाहिजे होते. माझा प्रश्न असा आहे की, वनखात्यामध्ये मी तिसऱ्यांदा आहे. माजी महापौर श्रीम. कॅटलिन परेरा मॅडम यांच्या वॉर्डातल्या सर्व्हे नंबर शंभर हा बजेट तिसऱ्यांदा आलेला आहे याची चौकशी करण्यात यावी ही माझी सुचना इथे आहे. श्री. महेंद्रसिंग चव्हाण, मी होते ते होते हा बजेट पास झाला होता. परत हा बजेट कसा येतो. संबंधित अधिकाऱ्यांनी याचे उत्तर मला द्यावे. ही माझी सुचना नाही मागणी आहे. सर्वात प्रथम ह्याची चौकशी व्हावी. बजेटमध्ये घेतलेला आहे हा विषय तिसऱ्यांदा आलेला आहे. जर नसेल तर तुम्ही बघुन घ्या. हा विषय १०० नंबरचा पहिला बजेट पास झाला होता. तो पैसा कुठे गेला? सभागृह नेता आमची जरी सत्ता असेल आम्ही तरी तेव्हा होतो. आता आम्ही जेव्हा वनखात्यावर निवडून आलो तेव्हा पासून सारखी ओरडते आहे आत्ताच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी कोण मेश्राम साहेब, कुरळेकर साहेब, ईरकर साहेब या लोकांनी तुम्हाला आजच्या बजेटमध्ये घेण्यासाठी सांगायला पाहिजे होते. मागचे काय झाल ते तुम्ही सर्व ठरवा. परंतु आताचे जे संबंधित अधिकारी आहेत कुरळेकर साहेब, मेश्राम आहेत, ईरकर आहेत त्यांची चौकशी करावी ही माझी मागणी आहे. तुम्हाला पाहिजे ते पेपर पुरवठा करणार आहेत याचे उत्तर मला कोण देणार? अधिकारी देणार आहेत, तुम्ही देणार आहात? मला उत्तर पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. सदस्या श्रीम. वंदना चक्रे यांनी जी सुचना मांडलेली आहे त्या सुचनांचे गांर्भियाने पालन करा. शंभर नंबर आरक्षणाची चौकशी करा. कुरळेकर साहेबांना ऑलरेडी कार्यमुक्त केलेले आहे. बाकी अजुन कोणी दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही करा आणि या बजेटच्या आपण तरतुद केले तर सर्वात प्रथम १०० नंबर गार्डन आपण विकसित करा. आणि एप्रिल महिन्यापासुन काम करा. आमची आणि वंदना चक्रे मॅडमची सुचना घ्यावी. दुसरी गोष्ट जे श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी सांगितले आहे की, कपात केली आहे.कि ३० कोटी वरून १८ कोटी वर बजेट आणलेले आहे ते कूठेतरी अन्याय होत आहे. तर त्याची ३० कोटीची आयुक्त महोदयानी ३० कोटी दिले आहेत. जुबेर इनामदार याचे म्हणणे आहे की हे सगळ फूगवून आणलेले आहे. की काय म्हणजे अजून आम्ही कमी केलत अजून ती फिगर कमी करावी लागेल का? आणि १८ कोटी नाही. या वेळी आपण ३४ कोटी रुपये वृक्षप्राधिकरणसाठी केले आहेत. फक्त ते पूर्ण गार्डन विकसीत करायच तो हेड बांधकाम विभाग पाहील पान ते आपण बाऊन्ड्री काय ते शिबीर काम आणले आहे. म्हणून त्यांना एखादा कमी वाटत असेल तर धृवकिशोरजी आपल्या अपेक्षेप्रमाणे आम्ही केलेले आहे. ३० चे जागेवर आम्ही ३४ केलेले आहे आपण खरोखर अभीनंदन करायला पाहिजे मा. महासभा व स्थायी समितीचे की आपली अपेक्षेपेक्षा जास्त केलेले आहे. महापौर मॅडम आम्ही ठराव मांडलेला आहे ती मंजूर करावा अशी आमची विनंती.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बांधकाम विभागावर जास्त मेहेरबाणी दिसते आहे साहेब आख्ये बजेट सगळ बांधकामावर दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घ्या. ठराव सर्वानुमते मंजूर.

**जुबेर इनामदार :-**

आमचा ठराव आहे. चर्चा केल्याशिवाय ठराव कसा करायचा फक्त ठराव करायचा आणि घरी जायच अस नाही. आमदारच्या बरोबर बसलेले ते महापौर होते. दिवसभर चर्चा चाललेली ही सभा फक्त बजेट अर्थ संकल्पनेवर चर्चा पान आणि पान उलटून केली आहे. मी त्यांचे अभिनंदन करू इच्छितो आणि परत तसाच तो पायंडा परत चालवावा.

**डॉ. आसिफ शेख :-**

शहराचा सर्वांगीण विकास आपल्याला करायचा आहे. आम्हाला बोलून देणार नसाल तर योग्य होणार नाही. आमच्या बजेटवर सुचना आहेत.

**प्रमोद सामंत :-**

वर्ष २०१५-१६ चा सादर केलेला अर्थसंकल्प जादाचा असून त्याचा परिणाम मुळ अंदाजपत्रकावर होणार आहे.

तरी सादर केलेला वृक्षप्राधिकरणाच्या अंदाजपत्रकात कमी केलेली तरतूद वृक्षप्राधिकरण विभागास देण्यात यावी. त्याची सुधारणा करण्यात यावी. वृक्षप्राधिकरण विभागाला उद्याने व दुभाजक सुशोभिकरण या अंतर्गत ७.५० कोटी रुपयांची वाढीव तरतुद करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दोन ठराव झाले मतदान होईल.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब ठराव मतदानाला घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

दोन ठराव आलेले आहेत सन्माननीय चक्रे मॅडमने सुचना मांडलेली आहे तरी खुलासा करावा त्यांची सुचना कूठल्या ठरावात घ्यायची आहे.

**मा. महापौर :-**

चक्रे मॅडम तुमची सुचना कोणत्या ठरावात घ्यायची.

**वंदना चक्रे :-**

मी थोडे करेक्शन करते. मा. महापौर कॅटलीन परेराच्या आधी मेहता साहेब होते. श्री. तुळशीदा म्हात्रे साहेब महापौर होते त्यावेळेस १०० नंबरचा सर्व्हे पास झालेला. तुम्ही म्हणता सुचना कशामध्ये घ्यावी विचारता ना........

**मा. महापौर :-**

मॅडम मी आपल्याला चौकशी करण्याची खात्री दिलेली आहे. पण जी सुचना मांडली आहे ती कुठे क्लबअप करायची ते सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावावर मतदान घ्या.

**डॉ. आसिफ शेख :-**

सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे एक अंदाजपत्रक वृक्ष प्राधिकरण विभाग या ठिकाणी आमच्या काही सुचना आहेत सर्वप्रथम आपल्या स्थायी समिती सभापती श्री. प्रशांत केळुसकर यांनी आज या महासभेमध्यसे जो बजेट सादर केलेला आहे त्याबद्दल मी प्रथम अभिनंदन करतो आणि त्याचप्रमाणे आजच्या या महासभेला खरे म्हणजे सन्माननीय आयुक्त उपस्थित राहणे हे अत्यंत आवश्यक होते. सन्माननीय उपायुक्त मुख्यालय यांनी खुलासा केला की लक्षवेधी आहे म्हणून त्या ठिकाणी गेले. परंतु, त्याठिकाणी एवढी महत्वाची नसते. ह्याठिकाणी मा. आयुक्तच उपस्थित पाहिजे होते. ७५२ कोटीचा जो बजेट होता गेल्या वर्षी १३५० कोटीचा आपण फुगवलेला आहे त्याबद्दल आम्ही निषेध करतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४ करीता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. शरद पाटील व दुसरा ठराव सुचक श्री. प्रमोद सामंत.

**डॉ. आसिफ शेख :-**

सचिव साहेब, आम्ही सुचना करतो तुम्ही आमच्या सुचना घेणार की नाहीत.

**मा. उपमहापौर :-**

डॉ. आसिफ शेख तुमची सुचना द्या.

**बर्नड डिमेलो :-**

मंजूर करायची नसेल तर आम्हाला बाहेर काढा.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसून घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. आसिफ शेख :-**

सन्माननीय मॅडम पान क्र. ३ वर माती व शेणखत खरेदी सन २०१४-१५ साठी ६० लाख रू. तरतूद करण्यात आली होती. आणि १/०४/२०१४ ते ३०/११/२०१४ पर्यत एकही पैसा खर्च झाला नाही. आणि ०१/१२/२०१४, ३१/०३/२०१५ ह्यामध्ये ६० लाख खर्च होणार असे त्यांनी दाखवलेले आहे. आणि वृक्ष प्राधिकरणचे अध्यक्षांचा अंदाज आहे. १ कोटीचा प्राधिकरणाचा अंदाज आहे. १ कोटींचा स्थायि समिती जास्त वाढवत आहे. छोटे मिया तो छोटे मिया बडे मिया भी सुभानअल्ला. ह्या पध्दतीने जर करत असाल तर योग्य नाही.

**रोहिदास पाटील :-**

सध्या सभागृहात दोन पक्ष आहेत विरोध करणार, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी.

**मा. महापौर :-**

मतदानांची प्रक्रिया चालू होत आहे सर्वानी खाली बसून घ्या.

**डॉ. आसिफ शेख :-**

सूचना क्र. १ माती व शेण खत खरेदी त्याठिकाणी सन्माननीय अध्यक्ष आणि वृक्ष प्राधिकरण समिती अंदाज १ कोटीचा जो ठेवण्यात यावा त्याचप्रमाणे अनुक्रमांक ८ ट्रीगार्ड खरेदी व दूरुस्ती मला वाटते ३-४ महिण्यापूर्वी ह्याठिकाणी आपण निविदा काढल्या होत्या त्या ठिकाणी जी आपण तरतूद केली केली मागच्या वेळेत फक्त ५ लाख रूपये होते आता सरळ तुम्ही एक कोटी तरतूद झाली. ट्रीगार्ड त्याच्या निविदा तर आपण आत्ताच काढल्या आहेत. १ कोटी आवश्यकता आहे ती ५० लाख करण्यात यावी. आम्हाला सुचना करायची आहे. तुम्हाला मान्य असेल तर करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

संदर्भासह दुरुस्ती करुन सुचना केलेली आहे.

**डॉ. आसिफ शेख :-**

पान क्र. ४ वर १९ नंबर उदयाने व दुभाजक सुशोभिकरण करणे या ठिकाणी आपण मागच्यवेळी २०१४-१५ मध्ये ८ कोटीची वाढ केला होता आता त्यामुळे आपण आता १५ कोटी घेणार आहोत आणि स्थायी समिती आणि ह्याठिकाणी पण आपल्या शहरामध्ये शिवमूर्ती नाईक साहेब ह्या ठिकाणी आयुक्त असताना त्यांनी चांगली संकल्पना केली होती की शहरात जे म्हणजे विकासकर्ते आहेत काही चांगल्या सामाजिक संस्था आहेत तर त्यांच्याकडून पण आपल्या महानगरपालिकेला हातभार लागला पाहिजे.आपल्या महानगरपालिकेचा खर्च हा वाचला पाहिजे त्या दृष्टीकोनातून बी.ओ.टी ची संकल्पना आहे. ती अमलात आली होती परंतू आता बी.ओं.टी. दिसत नाही. हे संपूर्ण जे बजेट आहे. बी.ओ.टी. कडून जे तत्वावर दिल तर निश्चितपणे महानगरपालिकेचा फायदा होईल ही सुचना आपण अनुक्रमांक २२..............................

**मा. महापौर :-**

मा. आसिफ शेख तुम्ही बसून घ्या. तुमची सुचना लेखी द्या.

**डॉ. आसिफ शेख :-**

मॅडम, लेखी द्यायची पध्दत नसते. पान क्र ४ वर घोडबंदर किल्ला सुशोभित करण्यासाठी महापौर सन्मा. आमदार प्रताप सरनाईक साहेब यांनी प्रयत्न दिले आहे.त्यांना धन्यवाद देतो. परंतु या ठिकाणी जी तरतुद केली आहे. ती दोन कोटीची केली आहे. पण सन्माननीय आमदार यांच्यामध्ये समाविष्ट आहे का? पान

क्रमांक चार वर अनुक्रमांक २३ तिवराची लागवड वृक्ष प्राधिकरण समिती यांनी ५० लाखांची तरतुद केलेली आहे. मात्र स्थायी समितीने ५ लाखांची तरतूद केली आहे

**नगरसचिवः-**

श्री. प्रमोद सामंत यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांना हात वर करायचे आहे. शरद पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करयचे आहेत. शरद पाटील यांच्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

श्री. शरद पाटील यांच्या बाजूने ४६ आणि विरोधात ३७ श्री. शरद पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९४ :-**

वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७१, ठराव क्र. १६०)

**ठराव क्र. ८३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक विचारात घेऊन मा. आयुक्त सा्ो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या / फेरबदल करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेले अंदाजपत्रक स्विकारुन आजची ही मा. विशेष महासभा अंदाजपत्रकास मंजुरी देत आहे.

**(आकडे लाखात)**

| तपशिल | 2014-15 (सुधारित अंदाज) | 2015-16 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 263.96 | 290.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 1381.04 | 1855.00 |
| एकूण खर्च | 1645.00 | 2145.00 |

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | **निरंक** |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | शिल्पा भावसार | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसानी | ८ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| १० | जैन गिता भरत | १० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | शबनम लियाकत शेख | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | पाटील सुनिता कैलास | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | विराणी रेखा अनिल | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | वंदना रामदास चक्रे | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | अनिता जयवंत पाटील | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | काझी रशीदा जमील | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | इनामदार जुबेर | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | सामंत प्रमोद जयराम | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | २५ | रकवी सुहास माधवराव | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | तारा विनायक घरत | २६ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | २७ | खण्डेलवाल सुरेश | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | २८ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| २९ | परमार अनिता भरत | २९ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | |
| ३० | पाटील प्रणाली संदिप | ३० | डॉ. आसिफ शेख | |
| ३१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | ३१ | लियाकत ग. शेख | |
| ३२ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३२ | नरेश तुकाराम पाटील | |
| ३३ | संदिप मोहन पाटील | ३३ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३४ | वंदना मंगेश पाटील | |
| ३५ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३५ | अशोक तिवारी | |
| ३६ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३७ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३८ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३९ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ४० | भोईर भावना राजू | | | |
| ४१ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४२ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४३ | मुन्ना सिंग | | | |
| ४४ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ९५, शिक्षण विभागाचे सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७२, ठराव क्र. १६१)

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये चर्चा करुन काही दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे मा. स्थायी समितीने मंजूर केलेले अंदाजपत्रक स्विकारुन यास मा. विशेष महासभा मंजुरी देत आहे.

**(आकडे लाखात)**

| तपशिल | 2014-15 (सुधारित अंदाज) | 2015-16 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1409.36 | 1613.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 764.81 | 1520.00 |
| एकूण खर्च | 2174.17 | 3133.00 |

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम आसिफ शेख साहेब सुचना मांडत होते माझे हे सांगणे आहे की, आपण सुचना घ्यायची की नाही ते आपण ठरवायचे आहे. परंतू त्यांना पूर्ण बोलू द्यायचे. आपण शिकलेले आहेत. आपण तज्ञ आहात आपण असे करु नये अशी माझी सुचना आहे.

**मर्लिन डिसा :-**

बजेट का एज्यूकेशन डिपार्टमेन्ट के लिए दिया है उसके लिए हमारा विरोध नही जो सुचना दे रहे हो उसको समावेश किजीए। सुचना है पेज नंबर ४ संगणक प्रशिक्षण जो है कॉन्ट्रयाक्टर को ३५ रू. पर स्टूडंट का जो पेमेन्ट कर रहे है। लास्ट टाईम मन्डे के मिटींग में कॉन्ट्रयाक्टर के बारे में काफी कम्पलेन्ट है तो इट यू कूड चेंज द कॉन्ट्रयाक्टर ॲन्ड गेट जस्टीस डन स्टूडंट नं.१५ शाळा इमारत दूरूस्ती वन करोड अभी तक एक्सपेन्स नही दिखाया है। फस्ट डिसेंबर टू ३१ मार्च टूडे इज ३० मार्च ॲन्ड वन करोड २० लॅक्स स्टील रिमेनिंग इसका मतलब क्या है। ॲन्ड हाउ मेनी स्कूल डू यू हॅव १ टू ४ यह स्कूल अभी हम लास्ट इयर व्ही स्टार्टेड स्टॅन्डर्ड ४ तो सारे स्कूल जितने भी ४ स्टॅन्डर्ड तक है दे शूड बी अप टू ८ स्टॅन्डर्ड अर्कोडिंग टू राईट टू एज्यूकेशन तो यह इन्फ्रास्ट्रक्चर है उसके लिए बढाके प्रोव्हिजन किजीए। ताकि सारे स्कूल व्हील रन

अपटू ८ स्टॅन्डर्ड ॲन्ड फॉलविग हियर ९ स्टॅन्डर्ड ऑल्सो तो इसके लिए प्रोव्हिजन किजीए। नं. १७ आदर्श शिक्षक पूरस्कार गूणवंत विदयार्थी एक लाख अभी तक बाकी है। खर्चा नही किया है अगले साल के लिए ५ लाख रखा है। तो यह साल का एक लाख क्या किया अभितक खर्चा नही दिखाया महापौर चषक का इव्हेन्ट नही हूआ उसका एक लाखसे १ करोड है इसमे क्या ॲक्टीव्हिटी होने वाले है। १ लाख जो बाकी है वो कम्पलीट करना चाहिए था। आमदार के तरफसे नही है। यह एम बी एम सी का बजेट है। नं.२३ आय ए एस, आय पी एस, एम पी एस सी प्रशिक्षण अजून खर्च केला नाही. पेज नं. ५ शाळा पूर्नःबांधणी वन करोड टू लॅक्स स्टील रिमेनिंग तो यह कौनसा बिल्डींग विच स्कूल नं. इसमे तो आपने ७ करोड का प्रोव्हिजन किया है। क्या यह सारे स्कूल अप टू ८ और ९ स्टॅन्डर्ड करेंगे।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम जसा वृक्ष प्राधिकरणाच्य बजेटच्या वेळेला अन्याय केला तसा शिक्षण कमिटीच्या बजेटमध्ये अन्याय केला शिक्षण कमिटीमध्ये प्रशासनाने १९ कोटीची तरतूद केली होती परंतू आपण फक्त १५ कोटीची तरतूद केली म्हणजे ही किती अन्याय केला. मागच्य मिटींगमध्ये आपण गणवेश वाटपामध्ये १० टक्के वाढ गृहीत धरून आपण प्रस्ताव पास केला. तुम्ही बजेट कमी केले हे चूकीचे आहे. पेज नं.२ महानगरपालिकाकडून हस्तांतरण १९.२८ चे १५.२० केले म्हणजे आपण जवळ जवळ ४ कोटी कमी केले. शिक्षणाचा बजेट आपण वाढवला पाहिजे जे प्रायव्हेट स्कूल आहेत कॉन्हव्हेटचे स्कूल जे महिन्याला ५०-६० हजार महिना घेतात ते बंद करण्याकरिता आपल्या एज्यूकेशनचे बजेट वाढवले पाहिजे. त्याच्यात मी काही सुधारणा देतो. शालेय गणवेश वाटप त्याच्यात आपण ७० लाख तरतूद केली आहे. प्रशासनाचे म्हणणे एक कोटीची तरतूद केली आहे. प्रशासनाचे म्हणणे एक कोटीची पाहिजे आपण मागेच ठराव केला त्याच्यामध्ये आपण १० टक्के वाढ केली म्हणूण ही वाढ करावी लागेल. पेज नं. ३ शालेय दप्तरे, बूट, मोजे वॉटर बॉटल हे पण त्याच्यमध्ये इनक्लूड आहे.१ कोटीची तरतूद ८० लाखाची केली आहे. ती वाढवली पाहिजे. महापौर चषक १ करोड आहे ते कमी केले पाहिजे १ करोडमध्ये ते कमी करा. महापौर चषक मध्ये कमी करा २०-२५ लाख रू. ठेवा त्याच्यानंतर आय ए एस, आय पी एस, एम पी एस सी ह्याच्यमध्ये १५ लाख आहेत ते बजेट वाढवा त्याची गरज आहे त्याच्यात २५-५० लाख ठेवले पाहिजे शाळा इमारती बांधणी आणि पुर्नःबांधणी ह्याच्यात प्रशासनाचे १० कोटी होत आपण ७ कोटी केले आहेत हे आपल्याला वाढवले पाहिजे तो त्याचा विषय आहे. शाळा इमारत बांधणी, पुनः बांधणी हे बजेट वाढवले पाहिजे. कारण भरपूर शाळा रिपेयर करायच्या आहेत जिल्हा परिषदेकडून जे हस्तांतर करून घेतले आहेत २८ शाळा पुर्नःबांधणी झाली नाही त्यामूळे इकडे बजेट दिले पाहिजे संगणक खरेदी १ लाखाच ठेवली आहे. ती वाढवली पाहिजे. पूर्ण जग कम्प्यूटरायझेशन होते आणि आपण मागे का ? आमची तुम्हाला विनंती आहे तुम्ही केलेले बजेट चूकीचे आहे आमच्या सुचना तुमच्या ठरावात घ्या अशी आमची विनंती आहे.

**आसिफ शेख :-**

सन २०१४-१५ सुधारित आणि २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक वृक्ष प्राधिकरणचे बजेट आपण सुचनेसह मंजूर केले त्याबद्दल आपले धन्यवाद ह्याठिकाणी शिक्षण मंडळाचे बजेट सादर करण्यात आले आहे. खाजगी शाळेप्रमाणेच मिरा भाईदर महानगरपालिकाचे गोर गरिब विदयार्थी आणि झोपडपट्टीतील विदयार्थी शिकत आहेत त्यांना खाजगी शाळेप्रमाणे गुणवत्ता आणि दर्जेदार शिक्षण देणे हे घटनेनुसार बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे आपल्याला पूर्ण शाळेचे डिजीटलायझेशन करायचे आहे. त्यासाठी शिक्षण विभागाच्या बजेटमध्ये काही सुचना आहेत त्याची आपण नोंद घ्यावी आणि बजेटमध्ये सुधारणा करावी. पान क्र. ३ ह्यामध्ये शालेय गणवेश, बॅच, टायसह ह्याठिकाणी मा. आयुक्तानी १ कोटीची तरतूद केली आहे. स्थायी समितीने ७० लाखाची तरतूद केली आहे मा. आयुक्तानी एक कोटीची तरतूद केली आहे ती कायम ठेवावी अशी आमची सुचना आहे. कारण शालेय विदयार्थ्याला गणवेश आणि टाय बॅच देणे आवश्यक आहे. अनुक्रमांक ६ शालेय दप्तरे, बूट, मौजे, वॉटरबॉटल वाटप त्यामध्ये मा. आयुक्तांनी एक कोटीची तरतूद केली आहे . स्थायी समितीने ते ८० लाखाची केली. ती एक कोटीची कायम ठेवण्यात यावी. पान क्र. ४ अ.क्र. १४ संगणक प्रशिक्षण तर ह्यामध्ये सन्मा. सदस्यानी काही सुचना केल्या आहेत माझे असे मत आहे की, मा. आयुक्तांनी जी ४५ लाखाची तरतूद केली आहे आणि स्थायी समितीने ती ४० केली आहे . आपल्या मिरा भाईदर महानगरपालिकेच्या हद्दीत जेवढया शाळा आहेत ऊर्दू,हिंदी,मराठी, गुजराती त्या संपूर्ण शाळेत संगणक खरेदी करायला पाहिजे. प्रशिक्षण केद्र बंद केले पाहिजे कारण प्रशिक्षणाच्या नावाखाली आपण ठेकेदारांना मदत करतो. त्यामुळे विदयार्थ्यांना व्यवस्थित शिक्षण मिळत नाही. त्यामुळे नविन संगणक खेरेदी करावी किमान १ कोटीची तरतूद करावी. अशी माझी सुचना आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक सहल त्यासाठी १ कोटी केले आहेत. खाजगी शाळेतील विदयार्थ्यांना महानगरपालिका मुंबई दर्शनला नेतात किंवा राज्याबाहेर जी पर्यटन स्थळ आहेत त्यामुळे विदयार्थ्याच्या ज्ञानामध्ये भर पडली पाहिजे. १ लाखाची तरतूद म्हणजे काहीच नाही माझी सुचना आहे की महानगरपालिकेच्या शाळेत शिकणा-या गोरगरिब विदयार्थ्यासाटी ५० लाखाची तरतूद करण्यात यावी अशी आमची सुचना आहे. त्याचप्रमाणे १९ नंबर महापौर चषक एक कोटीची आहे ती जास्त आहे हा वायफळ खर्च आहे. एक कोटीवरून ते ५० लाख करावी त्यामध्ये आपण ते ॲडजस्ट करून घ्यावे. अशी आमची सुचना आहे. अनुक्रमांक २३ माध्यमिक शिक्षण सूरु करणे त्यामध्ये आपण मा. महासभा ११/१२/१३ ठराव क्र.५९ अन्वये आपण स्वय स्पष्ट ठराव केलेला आहे की मिरा भाईंदर महानगरपालिककेच्या प्राथमिक शाळेमध्ये १ते ७ वी पर्यत त्याच्या नंतर ८वी ९वी १०वी सूरू करायचे आहे. त्यामध्ये आपण १००

कोटीची तरतूद केली होती ती तरतूद ह्यासाठी केली होती की आपल्याला नविन इमारत बांधायची आहे. ज्या पध्दतीने शाळेची दूरुस्ती करायची आहे. माध्यमीक शाळा आपल्याकडें सूरू नाहीत. ८ वीचे वर्ग आपण सूरू केले आहेत पूढच्य वर्षी ९वी त्यानंतर १० वी त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. माझे स्पष्ट मत आहे की मिरा भाईंदर महानगरपालिकेतील गोरगरिब विदयार्थ्याना माध्यमिक शिक्षणची सोय व्हायला पाहिजे त्यासाठी आपण सोय करणे बंधनकारक आहे. त्यासाठी जास्तीत जास्त तरतूद ठेवली पाहिजे महानगरपालिकेने ११/१२/१३ ला ठराव केला त्याप्रमाणे कारवाई अजून झालेली नाही. ठराव वाचून कायम करण्यात आला परंतू अंमलबजावणी काही झाली नाही. संबधीत अधिका-यावर कारवाई झाली नाही. आपण ठराव करतो त्याच्यावर कारवाई होत नसेल तर उपयोग नाही. महापौर रूलिंग देतात आमच्या महापौर होत्या त्यांनी पण रुलिंग दिल्या पण रूलिंग दिल्यावर त्याच्यावर कारवाई काय होते ते बघणार की नाही बघणार ? प्रशासनाचे प्रमूख म्हणून डायसवर बसले आहेत. आपण जे रूलिंग देतो त्याच्यावर तंतोतंत कारवाई व्हायला पाहिजे. जे सोयीस्कर आहे ह्याच्यावर कारवाई करून घ्यायची आणि जे सोयीस्कर नसते त्याच्यवर कारवाई करून घ्यायची नाही ही पध्दत योग्य नाही. आपल्याला माध्यमिक ९वी आणि १० वीची शाळा सूरू करायची आहे. त्यासाठी आपण जो ठराव केलेला आहे ५५लाखापैंकी स्थायी समितीने १० लाख कमी केले तर त्यामध्ये किमान ५ कोटी तरतूद करण्यात यावी. त्याचप्रमाणे ८ वी चे वर्ग सुरु करणे शिक्षक मानधन आणि शैक्षणिक साहित्या हया ठिकाणी १ लाखाची तरतूद केली आहे ती कमी असून १० लाख करण्यात यावी अशी आमची सूचना आहे. त्याचप्रमाणे वाहन खरेदी, खाजगी वाहन भाडे त्याठिकाणी १-१ लाखाची तरतूद केली आहे ती तरतूद २५ लाखाची करण्यात यावी. अशी सूचना आहे. ३ मध्ये क्रिडा महात्सव, क्रिडा साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम हया सर्व गोष्टी करणे आवश्यक आहे. प्रशासन अधिका-याने १५ लाख रु. सांगितले आहे. स्थायी समितीने १० लाख केले. आमची सुचना आहे १५ लाख पण कमी आहेत. विद्यार्थ्यांना क्रिडा महोत्सव, क्रिडा साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम वेळोवेळी व्हायला पाहिजे. त्यासाठी २५ लाखाची तरतूद करण्यात यावी त्याचप्रमाणे शाळा इमारत बांधणी आणि पुर्नबांधणी हयासाठी प्रशासनानी जी १० कोटींची तरतूद केलेली आहे ती स्थायी समितिने ७ कोटींवर आणली आहे तर ती १० कोटी ॲज इट इझ ठेवण्यात यावी अशी आमची सूचना आहे. आता नविन शाळा बांधाव्या लागतील त्यासाठी तरतूद करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शाळा फर्निचर, वॉटर फिल्टर, खेळणी साहित्या हयासाठी १-१ लाख तरतूद ठेवली आहे. भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब यांनी स्वच्छ भारत अभियान त्याचप्रमाणे शाळेत जे विद्यार्थी जातात तिथे टॉयलेट, वॉटर कूलर अशी सुविधा नसते. प्रत्येक सदस्यांनी आपआपल्या परीने शाळेत व्हिजीट केली असेल तर त्यांच्या निदर्शनास आले असेल की शाळेची व्यवस्था योग्य नाही. त्याठिकाणी ५० लाखाची तरतूद करण्यात यावी, अशी आमची सूचना आहे. संगणक खरेदीसाठी एक कोटींची तरतूद करण्यात यावी अशी आमची सूचना आहे या सूचने सह ठराव मंजूर करा आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून शहराच्या हितासाठी मंजूर करा अशी सूचना आहे.

**प्रमोद सामंत :-**

स्थायी समितीने शिक्षण समितीचा अर्थ संकल्प सादर केलेला आहे. आमच्या कोणत्याही सदस्याचा विरोध नाही. आपण दरवर्षी शिक्षणाच्या बजेटमध्ये गणवेश, वहया, बूट, दप्तर महापौर चषक, शैक्षणिक सहली, शिष्यवृत्ती अशा विविध प्रोव्हिजन करत असतो. आपण जी प्रोव्हिजन करतो, आपले शिक्षक आपले व्यवस्थापन मूलांसाठी ज्या ज्या गोष्टी करतात त्या गोष्टीचे पूर्ण इम्पलीमेंटेशन झाले पाहिजे. ते इम्पलीमेंटेशन होत नाही असे दिसून येते. मी काकांशी बोलत होतो तेव्हा काका बोलले ९२ मध्ये आपल्याकडे १२ हजार विद्यार्थी होते आता ते ९ हजार आहेत. आपण दरवर्षी त्या विद्यार्थ्यांची संख्या १० टक्क्यांनी वाढवतो. त्याचे प्राव्हिजन करतो त्यांची व्यवस्था करतो आणि त्यांच्यापर्यंत त्या व्यवस्था पोहाचत नाहीत. आमदार साहेब म्हणतील हयावर्षी पोहोचणार आहेत नक्कीच पोहोचणार आहेत आपण त्यापध्दतीने प्रोव्हिजन केले पाहिज. ३६ शाळात काही ठिकाणी आम्ही व्हिजीट केली एकाही शाळेत मैदान नाही. मैदान असेल तर अतिक्रमण आहे. काही शाळेत विद्यार्थ्यांला जे लागते म्हणजे लायब्ररी किंवा प्रयोगशाळा, गार्डन असो अशी कोणतीही प्राव्हिजन आपल्याकडे नाही. सदस्यांनी आपआपल्या भावना प्रगट केलेल्या आहेत. आमदाराला स्थायी समिती सदस्याला, सभागृहाला आणि महापौरांना ज्या ज्या सूचना आल्या आहेत त्या सूचनांचा समावेश करावा. महापौर चषकासाठी पैसे कमी करावे असे माझे म्हणणे नाही. चांगले आहे प्रोव्हिजन आहे दरवर्षी मागे करायचे असे म्हणणे आहे. यावर्षी जे एक करोडचे प्रोव्हिजन केलेले आहे त्या ऐवजी शाळेतल्या विविध सुविधा सुधारण्यासाठी प्रयोगशाळा, रोपवाटिका, गार्डन मैदान आणि जे ॲटमॉस्पिअर आपण मुलांना दिले पाहिजे ते ॲटमॉस्पिअर देण्यासाठी आपण ५० लाखाची तरतूद करावी. ९वी १०वीच्या शिक्षकांना १ लाख रु. मानधन आपण ठेवलेले आहे. त्याची तरतूद थोडी वाढवावी. आणि ९ वी ते १० वीचे चालू करावे अशी माझी भावना आहे. ही कल्पना आपण समाविष्ट करुन घ्यावी आणि हा ठराव मंजूर करावा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विरोधी पक्षनेता, राष्ट्रवादीचे नेते ह्यांनी महानगरपालिका शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने काही सुचना केल्या त्याच्या लक्षात आले असेल की आपण निटनेटक्या सुचना केल्या त्या सभागृह आणि महापौर ऐकून घेते असे त्यांच्या लक्षात आले असेल. दोन ठराव व्हायचे आहेत ते सहकार्य करतील हे खरे आहे की महानगरपालिकेच्या शाळा आणि त्याच्यावर होणारा खर्च त्याच्यात होणारी घट पटसंख्या जी कमी होते हा चिंतेचा विषय आहे. शिक्षण क्षेत्रात काम करतो म्हणून सभागृहाचा नेता म्हणून

अपेक्षा करतो की ज्या-ज्या प्रभागामध्ये महानगरपालिकेच्या शाळा आहेत त्या-त्या प्रभागातील त्या नगरसेवकांनी केलेल्या सुचना स्वाभाविक आहे ज्या सुचना करायच्या असतील तर आपणही वर्षभर त्या शाळेशी आपला संपर्क राहिला पाहिजे. त्या पालकांशी, शाळेच्या शिक्षकांशी संपर्क राहिला पाहिजे. त्या शाळेमध्ये असलेले कर्मचारी त्यांच्याही काय व्यथा असतील त्या तुम्ही नेटनेटक्या दिल्या प्रशासन आणि सत्ताधारी पक्ष म्हणून आम्ही आश्वासित करतो. नक्कीच तुम्हाला खात्री देतो काल काय झाले ते सोडून द्या. मगाशी जसा खुलासा केला दरवर्षी वाढ होत नाही जी गेल्यावर्षी पटसंख्या असते त्याच्यावर गेल्यावर्षी ९००० होते. त्याच्या आदल्यावर्षी ९००० होती. ही एक प्रोव्हिजन आहे. संख्या वाढली तर मग गणवेश आणता येत नाही आणि दरली तर कोण घरी घेऊन जात नाही. एखादा शिक्षक किंवा कर्मचारी गणवेश घेऊन जातात असे होत नाही. पटसंख्यांच्या दृष्टीने आपण खरेदी करतो. तेव्हा १० टक्के प्लस पकडतो तर तोही विषय नसावा. महापौर चषकाबद्दल ज्या-ज्या सुचना मांडल्या आपण ह्यावर्षी असे ठरवले आहे. तुमची त्याच्यात सहमती असावी की मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ज्या शाळा आहेत त्याच्यामध्ये स्पर्धा आहे. खाजगी शाळा कशी जरी असली तर ती प्रयत्न करते की माझ्याकडे विद्यार्थी आले पाहिजेत ते आपलेही कर्तव्य आहे की ह्या शहरातले जास्तीत जास्त विद्यार्थी आपल्या शाळेत आले पाहिजेत. महानगरपालिकेच्या शाळेत फी नाही आहे सर्व सुविधा आहेत असे चित्र त्या पालकांना समजले पाहिजे. त्यांच्याजवळ विश्वास ठेवला पाहिजे मग हे काम कोण करणार? हे काय नगरसेवकांनी केले पाहिजे, आपल्या प्रभागातल्या पालकांना, नागरिकांना खात्री दिली पाहिजे. तुम्ही जी खाजगी शाळा तुमच्या डोक्यात आहे तेवढ्याच सुविधा महानगरपालिकेची शाळा देऊ शकते देत आहे किंवा देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करते असे चित्र तयार केले पाहिजे. शहराच्या आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ज्या सुचना असतील त्या पालन करायचा प्रयत्न करणार.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ९५ :-**

शिक्षण विभागाचे सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७२, ठराव क्र. १६१)

**ठराव क्र. ८४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये चर्चा करुन काही दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे मा. स्थायी समितीने मंजूर केलेले अंदाजपत्रक स्विकारुन यास मा. विशेष महासभा मंजुरी देत आहे.

**(आकडे लाखात)**

| तपशिल | 2014-15 (सुधारित अंदाज) | 2015-16 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 1409.36 | 1613.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 764.81 | 1520.00 |
| एकूण खर्च | 2174.17 | 3133.00 |

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी    अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, परिवहन सेवेचे सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७३, ठराव क्र. १६२ )

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजूर केलेले सुधारित व मूळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. विशेष महासभा सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मंजुरी देत आहे.

(आकडे लाखात)

| तपशिल | 2014-15 (सुधारित अंदाज) | 2015-16 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा | 5598.64 | 4298.58 |

| | | |
|---|---|---|
| “अ” अंदाजपत्रकातून हस्तांतरण | -- | 1500.00 |
| एकूण खर्च | 5598.64 | 5798.58 |

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याकडे १०० बसेसचा प्रस्ताव जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत प्रस्ताव मंजुर करण्यात आला होता आणि आपल्याला १०० बसेस जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत १०० टक्के अनुदान ह्या स्वरुपात आपल्याला मिळणार होते. मा. आयुक्तांनी त्याची माहिती द्यावी की ह्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख बजेटमध्ये नाही. अधिका-यांना विचारले तर अपुरी माहिती आम्हाला देतात किंवा ते स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

**कल्पिता पिंपळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते आपल्याला जे.एन.एन.यु.आर.एम च्या अंतर्गत १०० बसेस मंजुर आहेत ह्या १०० बसेससाठी आपल्याला ३६ कोटी अनुदान मंजुर झालेले आहे. ह्या ३६ कोटीमधून आपल्याला १८ कोटीचा पहिला हफ्ता प्राप्त झालेला आहे. ह्याच्यामध्ये डेपो इन्फ्रास्ट्रक्चरसाठी सुध्दा आपल्याला ६ कोटी अनुदान मिळणार आहे. ते अजून मिळालेले नाही मिळणार आहे. तसेच जेट - ५ जे वर्ल्ड बँकेकडून आपल्याला डेपो इक्वीपमेंटसाठी ॲन्ड आय.टी. साठी आपल्याला १० कोटीचे अनुदान मिळणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

सर्व अनुदान शासनाच्या माध्यमातून आणि वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून मिळत असताना महानगरपालिकेने १५ कोटी “अ” अंदाजपत्रकातून वर्ग केले. समोरच्या बाजूला तुम्ही जो खर्च दाखवला आहे. खर्चाच्या बाजूला जे एफ डी.पी.आर. प्रकल्प अहवाल नविन बसेसच्या साधनसामुग्री खरेदीमध्ये तुम्ही परिवहन व्यवस्थापकाचा अंदाज २६ कोटी रु. होता. स्थायी समितीने त्याचा अंदाज ३१ वर नेला. अनुदान स्वरुपात पैसे प्राप्त होताना १५ कोटी महसूलामधून वर्ग केले आहेत पूर्ण परिवहन समितीच्या अंदाजपत्रकामध्ये तुम्हाला जिथे योग्य वाटेल तिकडे विभागणी केली आहे. निधी महानगरपालिकेने स्थापित करायची आहे. अनुदानाच्या स्वरुपात मिळणा-या बसेस, डेपो उभारण्यासाठी मिळणारे अनुदान ते सगळे अनुदानाच्या स्वरुपात येताना सुध्दा तुम्हाला ह्या पैशाची गरज का?

**कल्पिता पिंपळे :-**

आपल्याला बसेससाठी ३६ कोटी मिळत आहेत. परंतु आपल्या जी टेंडर कॉस्ट आहे ती वाढते. ती टेंडरची कॉस्ट ४१ कोटी होते त्याच्यामध्ये ५ कोटीची तरतूद करायला लागणार आहे. डेपो इक्वीपमेंटसाठी ६ कोटी मिळतात. ह्याच्यामध्ये असे होते सी.एस.सी.जी. ची मिटींग झाली त्या मिटींगमध्ये असे ठरले की डेपो इन्फ्रास्ट्रक्चरसाठी ह्यांनी कितीही प्रप्रोजल पाठवले तरी सर्व राज्यांना ६ कोटी एवढे स्टिक अप लावलेले होते. परंतु जो डेपोचा खर्च आहे तो साधारण १४ कोटी पर्यंत येतो. त्याच्यामुळे आपल्याला ती ही तरतूद करावी लागणार आहे. त्यानंतर आपण आयटीएस प्रणाली राबवायची म्हटली तर त्याच्यासाठी पण तरतूद करावी लागणार आहे. त्याच्यासाठी काही स्टाफ नेमावा लागणार आहे. जे डेपो तयार होणार आहेत त्याला थोडा वेळ लागणार आहे. हे डेपो तयार होईपर्यंत जर बसेस आल्या तर बसेस कुठे ठेवायच्या त्यासाठी आपल्याला टेम्परपरी बस पार्किंग तयार करायला लागणार आहे. त्यासाठी आपल्याला प्रोव्हिजन करायला लागणार आहे. ह्या सर्व गोष्टींसाठी आपल्याला १५ कोटीची गरज लागणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्या शहरामध्ये परिवहन हा एक नेहमी चर्चेचा विषय राहिलेला आहे. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत आलेल्या ५० बसेस हे सर्व प्रकारच बाकी असताना एका वर्षात एवढा मोठा पराक्रम करायला निघालात १५ कोटी आमच्या मूळ अंदाजपत्रकामधून ह्या विषयाचा प्रशासनाने कधी विचार केला होता का? स्थायी समितीकडे तुम्ही प्रस्तावित केले. स्थायी समितीचा कदाचित तुम्ही भुमिका मांडली असेल आणि स्थायी समितीने योग्य वाटले जास्त पैसे देणे म्हणून त्यांनी दिले पण असेल पण खरी परिस्थिती काय? ग्राऊंड रिॲलीटी काय आहे. तुमच्याकडे बसेस आल्या आहेत का? एका बाजूला बस डेपोसाठी ३७ खाली राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत बस डेपोकरीता ३७ खाली विषय पाठवला असताना तुम्ही डेपो बांधणार कुठे? कोकणीमध्ये एक म्हण आहे म्हैस त्याचा गाडगा आधी म्हशीचाच ठिकाणा नाही. आणि दूध जमा करायला गाडगा पाहिजे. सभागृह नेते साहेब तुम्हाला ह्याची कल्पना आहे हे होऊ शकत नाही. मला प्रशासनाकडून स्पष्ट उत्तर पाहिजे की पुढच्या सहा महिन्यात बस येतात. सहा महिन्यात बसेस रस्त्यावर धावणार आहेत. तुम्हाला मी पाहिजे तेवढे पैसे देतो.

**कल्पिता पिंपळे :-**

साहेब आपण तीन टाईपच्या बसेसची पर्चेस ऑर्डर दिलेली आहे. त्याचे प्रोटोकॉल टाईप इन्स्पेक्शन सुध्दा झालेले आहे. त्या बसेसची चेसीस बघण्याचे काम चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

चेसीस तुम्हाला उपलब्ध झाल्या आहे. किती बसेस मिळणार १००.

**कल्पिता पिंपळे :-**

नाही ९०.

**जुबेर इनामदार :-**

कधीपर्यंत मिळणार आहे.

**कल्पिता पिंपळे :-**

जोपर्यंत टेम्परररी बस पार्कींगचा विषय, प्रश्न क्लियर होत नाही. तोपर्यंत बसेसचा प्रॉब्लेमच आहे.

**जुबेर इनामदार :-**

३७ खाली पाठवलेला विषय अजून राज्य शासनाकडे प्रलंबित असताना ह्या बाकीच्या बसेस उभ्या करायला जागा आहे का? जोपर्यंत जागा मिळत नाही तोपर्यंत तुम्ही बसेस आणत नाही. असेच तुमचे उत्तर असावे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, बस सेवा ही पब्लिक ट्रान्सपोर्ट सेन्ट्रल गर्व्हमेंट आणि स्टेट गर्व्हमेंटचा प्राधान्याचा विषय आहे. आपल्याकडे जागा आहे नाही आहे. नसली तर आपण शोधायला पाहिजे. त्या प्रयत्नात आपण आहोत. मॅडमनी १५ कोटीचे विवरण बजेटमध्ये धरले ते आता सांगितले. आपल्या बजेटला जर तरतूद नसेल तर पुढच्या वर्षी तुम्हाला करायचे आहे की नाही हा नक्कीच क्वेशन मार्क राहतो. बजेट तरतूद केली म्हणजे आपण ते काम करणार हे आश्वासन किंवा ह्या प्रकारची एक प्रचिती आहे की आम्ही हे करणार आहेत आता ह्याच्यात जो काही खर्च दाखवला ५ कोटी टेंडरची कॉस्ट वाढणार आहे. टेंडर झालेले आहे वर्क ऑर्डर झालेली आहे. म्हणजे निश्चितपणे हा खर्च वाढणार आहे. ८ कोटी डेपो इक्वीपमेंटसाठी त्याची जी निविदा काढली आहे जे आपल्याला ३७ चे प्रपोजल पाठवायचे आहे त्या जागेवर ट्रक टर्मिनल आरक्षण आहेच ती जागा ट्रान्सपोर्टेशनसाठी निश्चितपणे आरक्षित आहे. बस टर्मिनल आणि ट्रक टर्मिनल ह्या दोन्ही शब्दामध्ये जरी फरक असला तरी पब्लिक ॲक्टिव्हिटी म्हणून बस टर्मिनल हा केंद्र सरकारचा टॉप प्रायोरिटी विषय असेल तो राज्य शासनाला धरुन असेल पब्लिक ट्रान्सपोर्ट बळकट करणे तर तो आणि आपला अजेंडा एकच असला पाहिजे. त्यामुळे निश्चितपणे ह्या वर्षी तिथे डेपो बांधणार? आणि गर्व्हमेंटकडून आलेल्या मॅचिंग ग्रॅन्डला जर तरतूद आपल्या बजेटला नसेल तर त्याच्याकडून ग्रॅन्ट मागण्याचा प्रश्नच येत नाही. आणि ए.एम.सी. चा विषय असा आहे ३ ते ४ महिने लागतील किंवा ५ महिने लागतील पण निश्चितपणे ह्या २-४ महिन्यात बसेस येणार. आल्यानंतर आपले डेपो तयार व्हायला विलंब लागेल. परंतु दरम्यानच्या काळात आपल्याला काही ए.एम.सी. तयार करायला लागतील आणि त्या संबंधीत कंपन्याच्या बरोबर सुरुवातीचा जो काळ फ्रि असतो सर्विसिंगचा त्या काळाच्यानंतर सुध्दा डेपो तयार नाही होऊ शकले किंवा काही इक्वीपमेन्ट नाही आले तर आपली पर्यायी व्यवस्था असावी त्यामुळे आपण ही तरतूद केली आहे.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे तरतूद असावी पण काल्पनिक तरतूद नसावी.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

माझ्या हिशोबाने रिॲलिस्टीक तरतूद आहे.

**जुबेर इनामदार :-**

३७ खाली तुमच्याकडे आरक्षणात बदल नाही घडला तर तुम्ही डेपोसाठी तो खर्च करु शकाल का? हे करताना तुमच्या नियमात बसेल का? ट्रक टर्मिनलचे आरक्षण आहे. त्याला डेपोमध्ये रुपांतर करायचे असेल तर त्या तरतुदीखाली तुम्हाला खर्च करायचा आहे तो तुम्हाला करता येईल का? हा एक महत्वाचा विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सत्ताधाऱ्यांनी हा बजेट व्यवस्थित विचार करुन दिला आहे. जुबेर इनामदारजींचा अभ्यास कदाचित कमी असावा. जानेवारीची मिटींग सत्ताधारी पक्षांनीच लावली आर्थिक प्रशासकीय मान्यता देण्यासाठी आणि ते आपण मंजूर केले ३७ खाली आणि हे दोन्ही प्रशासकीय आर्थिक आपल्याकडून आली.

**जुबेर इनामदार :-**

चांगल्या कामासाठी आर्थिक प्रशासकीय मंजुरी आपण नेहमी देतो.

**नरेंद्र मेहता :-**

आर्थिक प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर तरतूद नको का?

**जुबेर इनामदार :-**

तरतूद नसताना आर्थिक प्रशासकीय मंजुरी आपण देतोच.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सरकार बदललेले आहे. गतिशील सरकार आहे. फटाफट निर्णय घेणार आहेत आणि आम्हाला खात्री आहे हे सरकार आपल्याला मंजुरी देणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुमचे सरकार एल.बी.टी. रद्द करणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

एल.बी.टी रद्द केली.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

एल.बी.टी. रद्द करणार म्हणजे हाच पैसा तिथे वर्ग करणार होते ना.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, बजेट मंजूर करा.

**जुबेर इनामदार :-**

सभागृहाची दिशाभूल करुन चालणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनानी श्री. जुबेर इनामदारच्या प्रश्नाचे व्यवस्थित उत्तर दिलेले नाही. १०० टक्के अनुदान सॅक्शन होऊन १ ते दीड वर्ष झाले. त्या अनुदानातून आलेल्या बसेस अडकल्या कुठे? त्याचा खुलासा करा मॅडमनी सांगितले आम्ही पर्चेस ऑर्डर दिली. पर्चेस ऑर्डर दिली कधी? आणि ती अजून पेंडींग का? साहेब तुम्ही बोललात टेंडर कॉस्ट वाढली ती टेंडर कॉस्ट अशामुळेच वाढते की आपण पर्चेस ऑर्डर देतो आणि त्याच्या मागे लागत नाही. आणि ६ महिने १ वर्षाने आपण सांगतो आम्हाला बसेस पाहिजे आणि मग ही कॉस्ट वाढते. देशमुख साहेब हे अनुदान आले कधी तुम्ही ऑर्डर दिली कधी आणि ह्या गाड्या अजून का पेंडींग पडल्या? मागच्या वेळी जेव्हा श्री. शरद पाटील स्टँडिंगचे चेअरमन होते त्यावेळी हा प्रस्ताव स्टँडिंग कमिटीमध्ये येणार होता. परंतु काही कारणास्तव आला नाही. त्याचा खुलासा करा.

**कल्पिता पिंपळे :-**

आपले अनुदान डिसेंबर महिन्यात आले आहे. दि. ५/०३/२०१४ ला वर्क ऑर्डर दिलेली आहे. दि. २३/०९/२०१४ चा जी.आर आहे. त्या जी.आर नुसार डिसेंबरमध्ये प्राप्त झालेल्या आहेत. आणि दि. ५/०३/२०१४ ला आपण वर्क ऑर्डर दिलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

अनुदानाच्या आधी.

**कल्पिता पिंपळे :-**

कारण ते मंजूर होते ना. मंजूर झाल्यानंतर पहिला हफ्ता मिळतो त्याच्यानंतर डिसेंबरला पहिला हफ्ता प्राप्त झालेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

डी.पी.आर जो दिला होता तेव्हा त्याचा दर आहे तो निश्चित होता ना. त्या आधारावर मार्चला वर्क ऑर्डर दिली. डी.पी.आर कधीचा आहे.

**कल्पिता पिंपळे :-**

दोन महिने अगोदरचा असेल.

**जुबेर इनामदार :-**

दोन महिन्यामध्ये एवढा फरक पडला नसेल. वर्क ऑर्डर दिल्यानंतर तुमचे रेट वाढतात का? अनुदानाचा पैसा डी.पी.आर प्रमाणेच आला असेल. शासनाने १०० टक्के अनुदान दिलेले असेल. शासनाने १०० टक्के तेव्हा अनुदान दिले आहे. मग ह्याचा अर्थ काय दोन महिन्यात बजेटची कॉस्ट वाढली.

**कल्पिता पिंपळे :-**

टेंडर जे आले ते अबव्ह आले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

टेंडरच्या नंतर वर्क ऑर्डर होते ना.

**कल्पिता पिंपळे :-**

हो. डी.पी.आर अगोदर होतो. डी.पी.आर नंतर जो मान्यतेसाठी पाठवला जातो त्याच्यातली तेवढी-तेवढी रक्कम मंजूर होत नाही. काही रक्कम ते मंजूर करतात.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही १०० टक्के अनुदान कसे बोलू शकता. तुम्ही बोला आम्ही ८० टक्के अनुदान झाले आहे. एका बाजूला १०० टक्के अनुदान प्राप्त झाले आहे असे सांगता आमची दिशाभूल करता. डी.पी.आर कितीचा होता.

**कल्पिता पिंपळे :-**

डी.पी.आर ए.सी. बसेसचे ९ कोटीचा होता. त्याच्यानंतर २१ कोटीच्या ज्या ७० बसेस होत्या. ९०० एम.एम. डिझेल स्टॅन्डर्ड नॉन एसी ह्याच्यासाठी होते. त्यानंतर २ कोटी ८० लाख ६५० एम.एम. डिझेल मिनी नॉन एसी बसेससाठी होते आणि २.५० कोटी ६५० एम.एम. डिझेल मिनी नॉन एसीसाठी होते.

**जुबेर इनामदार :-**

ह्या डी.पी.आरला १०० टक्के मंजूरी शासनाने दिली.

**कल्पिता पिंपळे :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

१०० टक्के अनुदान दिले. मग फरक कुठून आला.

**कल्पिता पिंपळे :-**

सर, मी तेच म्हणते टेंडर नुसार जी रक्कम आहे ती टेंडरचे अबव्ह आल्यामुळे त्याच्यामुळे फरक आलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

डी.पी.आर तयार झाला तो दराप्रमाणे टेंडर येते अबव्ह.

**कल्पिता पिंपळे :-**

डी.पी.आर म्हणजे एक अप्रोक्सीमेंटली कॉस्ट कळावी म्हणून आपण दिले होते.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण सन्मा. सदस्यांना बोलायची संधी देतो त्यांचे स्वागत करतो. अधिकाऱ्यांची जी प्रश्नोत्तर आहेत ती गटनेत्यांच्या केबीनमध्ये बोलवून बजेटच्या मिटींमध्ये एका-एका विषयावर....................

(सभागृहात गोधळ)

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम आमचा ठराव आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला बोलायचे आहे. ठराव मांडला पाहिजे का? वसई-विरारला रात्री १०.३० पर्यंत बजेटवर चर्चा झाली. १०.१५ वाजता ठराव मंजूर झाला. तिथे सगळ्यांना बोलायला दिले इथे मा. महापौर मॅडम बोलायला देत नाही.

**मा. उपमहापौर :-**

गेल्या वर्षी किती वेळात मंजूर केले तुमचे महापौर, उपमहापौर होते. अर्ध्या तासात बजेट केले.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दुसरा विषय घ्या. ठराव सर्वानुमते मंजूर.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही सांगितले की चांगल्या सुचना घेतो तर आम्ही चांगल्या सुचना देतो.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेता मी तुम्हाला संधी दिलेली तुम्ही ठराव मांडला नाही. तुम्हाला मांडायचा तर मांडा नाही तर मी पूढचा विषय घेते.

**प्रमोद सामंत :-**

वर्ष २०१५-१६ चा सादर केलेला परिवहन उपक्रमाचा अर्थसंकल्प हा जास्त वाढीचा असून त्याचा परिणाम मुळ अंदाजपत्रकावर होणार आहे.

तरी सादर केलेला परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रकात नविन बसेस खरेदी अंतर्गत २६ कोटी करण्यात यावी व त्याची सुधारणा अंदाजपत्रकात करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम आमच्या सुचना घ्या, तुम्ही घाबरता तुम्ही बोलू देत नाही.

**शरद पाटील :-**

मॅडम परिवहनचे ह्यांच्या राज्यात चालू केले. त्यांची दुर्दशा ह्यांनी काय केली ह्यांना माहित आहे.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याच लोकांनी विरोध केला होता. तुम्ही एक रुपयाही अनुदान दिले नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६ करिता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक सौ. निलम ढवण दुसरा ठराव सुचक श्री. प्रमोद सामंत. ..................

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब आम्ही सुचना मांडल्या तुम्ही त्या घेत नाही. तुम्ही ठराव वाचता मुंबई प्रांतिक अधिनियम काय म्हणतो. सदस्यांना मत मांडण्याचा अधिकार आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

श्री. प्रमोद सामंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सौ. निलम ढवण ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या

बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सौ. निलम ढवण ह्यांच्या बाजूने ४३, विरोधात ३४ इतकी मते पडली आहेत. सौ. निलम ढवण यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९६ :-**

परिवहन सेवेचे सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७३, ठराव क्र. १६२ )

**ठराव क्र. ८५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजूर केलेले सुधारित व मूळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. विशेष महासभा सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मंजुरी देत आहे.

(आकडे लाखात)

| तपशिल | 2014-15 (सुधारित अंदाज) | 2015-16 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा | 5598.64 | 4298.58 |
| "अ" अंदाजपत्रकातून हस्तांतरण | -- | 1500.00 |
| एकूण खर्च | 5598.64 | 5798.58 |

**सुचक :- सौ. निलम ढवण** **अनुमोदक :- श्री. अनिल भोसले**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसानी | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | शबनम लियाकत शेख | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | पाटील सुनिता कैलास | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | वंदना रामदास चक्रे | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | अनिता जयवंत पाटील | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | काझी रशीदा जमील | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | इनामदार जुबेर | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | रकवी सुहास माधवराव | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | |
| २५ | तारा विनायक घरत | २५ | खण्डेलवाल सुरेश | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | २६ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | २७ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | |
| २८ | परमार अनिता भरत | २८ | डॉ. आसिफ शेख | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | २९ | लियाकत ग. शेख | |
| ३० | गावंड मंदाकिनी आत्माराम | ३० | नरेश तुकाराम पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३२ | संदिप मोहन पाटील | ३२ | वंदना मंगेश पाटील | |
| ३३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३३ | अशोक तिवारी | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३५ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३६ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३७ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३८ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३९ | भोईर भावना राजू | | | |
| ४० | भोईर राजू यशवंत | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४२ | मुन्ना सिंग | | | |
| ४३ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९७, सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ ‘‘अ’’ + ‘‘क’’ + ‘‘अग्निशमन’’ + ‘‘अंध व अपंग’’ + ‘‘महिला व बालकल्याण’’ + ‘‘JNNURM’’ + ‘‘P’’ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७४, ठराव क्र. १६३)

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी ‘‘आदर्श वार्ड’’ योजना यासाठी रु. १० कोटी तसेच आयुक्त / महापौर निवास नुतनीकरणासाठी रु. १ कोटी तरतूद कराचे वाढीव उत्पन्नातुन करण्यात यावी तसेच सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे दुरुस्त्या व सुधारणांसह सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. विशेष महासभा मंजुरी देत आहे.

**सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाज व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक (आकडे लाखात)**

| तपशिल | **2014-15** (सुधारित अंदाज) | **2015-16** (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ‘‘अ’’ + ‘‘क’’ + ‘‘अग्निशमन’’ + ‘‘महिला व बालकल्याण’’ + ‘‘अंध व अपंग’’ + ‘‘JNNURM’’+ ‘‘P’’= एकूण जमा | 100727.86 | 155170.64 |
| अंदाजपत्रक ‘‘अ’’ + ‘‘क’’ + ‘‘अग्निशमन’’ + ‘‘महिला व बालकल्याण’’ + ‘‘अंध व अपंग’’ + ‘‘JNNURM’’+ ‘‘P’’= एकूण खर्च | 83066.59 | 155149.44 |
| अखेरची शिल्लक | 17661.27 | 21.20 |

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील    अनुमोदक :- सौ. निलम ढवण**

प्रभाग समिती निधी व नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत नगरसेविका / नगरसेवक हे त्याचे प्रभागाव्यतिरिक्त इतर प्रभागात संबंधित नगरसेवकांच्या लेखी सहमतीने कामे करु शकतील. तसेच सर्व नगरसेवक / नगरसेविका यांनी सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर त्यांना देण्यात आलेला नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधीतून काही कारणामुळे कामे झाली नसल्यास त्यांना त्यावेळेस देण्यात आलेल्या तरतूदीतील प्रलंबित कामे व सन २०१५-१६ च्या वर्षातील तरतूदीतील कामांची यादी बांधकाम विभागाकडे ३० एप्रिल २०१५ पर्यंत देण्यात यावी. बांधकाम विभागाने नगरसेवक / स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधीतील अशा सर्व कामांची नगरसेवक निहाय एकच अंदाजपत्रक तयार करुन मान्यता घेऊन निविदा मागवावी. प्रभाग समिती निधीतील कामे प्रभाग समितीकडून मंजूर करुन घ्यावीत. जेणेकरुन सर्व कामे मुदतीत पूर्ण होऊन यापुढे स्पील ओव्हर राहणार नाही व नगरसेवकांची देखील याबाबत तक्रार राहणार नाही. सर्व नगरसेवक / नगरसेविका यांनी ३० एप्रिल २०१५ पर्यंत नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधीतील

कामांचे एकत्रित प्रस्ताव देण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन सदर निधीतून पुरेशी तरतूद करता येईल. मुदतीत प्रस्ताव न दिल्यास खर्च पडणार नाही.

तसेच सन २०१५-१६ या वर्षापासून सन्माननीय नगरसेवक / नगरसेविका यांना सर्व स्टेशनरी, दुरध्वनी, भ्रमणध्वनी बिल व इतर यासाठी महिना रु. २५००/- रक्कम मानधनासमवेत देण्यात यावे.

**सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पातून करावयाची कामे**
**(सार्वजनिक बांधकाम विभाग)**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | सर्व कार्यालये /आयुक्त / महापौर कार्यालय / निवास, सभागृह, फर्निचर व इतर सुविधा उपलब्ध करणे. | रु. १.०० कोटी |
| २ | भाईंदर (पूर्व) केबिन रोड आरोग्य केंद पहीला माळा बांधणे. | रु. ७०.०० लक्ष |
| ३ | भाईंदर (पूर्व) आ. क्र २४१ कम्युनिटी सेंटर बांधणे. | रु. ५.०० कोटी |
| ४ | आ.क्र. १०८ मार्केट बांधणे. | रु. ३.०० कोटी |
| ५ | मनपा क्षेत्र Wifi करणे. | रु. १.०० कोटी |
| ६ | मोर्वा तलाव बांधणे. | रु. २.०० कोटी |
| ७ | पेणकर पाडा साईदत्त तलाव पुर्नाबंधणी करणे. | रु. २.०० कोटी |
| ८ | मनपा क्षेत्रात नव्याने अभ्यासिका E- Library  तयार करणे. | रु. १.०० कोटी |
| ९ | भाईंदर (प.) रेल्वे समांतर रस्ता मिरारोड स्टेशनकडे जाणारा तयार करणे. | रु. ५.०० कोटी |
| १० | भाईंदर (प.) गणेशदेवल नगर, आरोग्य केंद्र / बांधणे. | रु. ७५.०० लक्ष |
| ११ | भाईंदर (प.) चर्च ते गणेश देवल नगर पाठीमागील रस्ता तयार करणे. | रु. १.०० कोटी |
| १२ | भाईंदर (प) सुभाषचंद्र बोस मैदान मातीभराव, कुंपण भिंत व इतर आवश्यक कामे करणे. | रु. १.०० कोटी |
| १३ | भाईंदर (प.) विसर्जन धक्का (नविन जागा) | रु. १.५० कोटी |
| १४ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण करणे. | रु. १.५० कोटी |
| १५ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग सर्व्हीस रस्ते सुशोभिकरण काम इतर आवश्यक कामे करणे. | रु. ७.०० कोटी |
| १६ | मिरारोड (पूर्व) आ.क्र २६४ कार्यालय इमारत बांधणे. | रु. ३.०० कोटी |
| १७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र १२२,१७८,१९६,२२१,२१४, ११७,१२२सी,२३०,२३५,२४२,३००,२४८,२६९,२४६,२५४,२९९,३६५,३५५, ३७१ उदयाने मैदाने विकसीत करणे. | रु. १६.०० कोटी |
| १८ | पेणकरपाडा स्मशान समोरील मैदान विकसीत करणे. | रु. ५०.०० लक्ष |
| १९ | नवघर इंदीरानगर शौचालय बांधणे. | रु. ५०.०० लक्ष |
| २० | मनपा क्षेत्रातील अ) शौचालये, सार्व इमारती शाळा इमारती , मैदाने, उदयाने, तलाव, नाले, गटारे, फूटपाथ, स्मशानभुमी इ. मधील दुरुस्ती करणे.<br><br>ब) रस्ते देखभाल दुरुस्ती कामे | रु. ४.०० कोटी<br><br>रु. ३५.०० कोटी |
| २१ | रेन्टल हाऊसिंग योजनेतुन विविध विकासकामाची कामे करणे. | रु. १६.०० कोटी |

| | | |
|---|---|---|
| २२ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.१२१ वाचनालय बांधणे. | रु. १.५० कोटी |
| २३ | भाईंदर (पूर्व) गोडदेव, भाईंदर (प.) स्मशानभुमी विकसीत करणे | रु. २.०० कोटी |
| २४ | मिरारोड आ.क्र १८४ पार्कीग विकसीत करणे | रु. १०.०० कोटी |
| २५ | भाईंदर (पूर्व) मनसा अपार्ट ते तिरूपती वंदना इमारतीपर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. १०,७५,९५०/- |
| २६ | भाईंदर (पूर्व) शितल कॉम्पलेक्स ते रमेश अपार्टमेंट पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. २९,०६,३५०/- |
| २७ | भाईंदर (पूर्व) क्रिष्णा गीता इमारत ते मुनिष पेटल रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ४२,६२,१५०/- |
| २८ | भाईंदर (पूर्व) क्रिष्णा पालखी ते रामदेव हाईट्स पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| २९ | भांईदर (पूर्व) तपोवन विद्यालय ते राम वाटीका पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३७,७९,९००/- |
| ३० | भांईदर (पूर्व) राज वैभव ते शुभम हाईट्स रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ६०,६७,१००/- |
| ३१ | भांईदर (पूर्व) मथुरा अपार्ट ते आर.बी. के. ग्लोबल स्कुल रस्त्याच्या दोन्ही बाजुस गटार बांधणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| ३२ | भांईदर (पूर्व) आर.बी.के. ग्लोबल स्कुल ते एम्स जंक्शन पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| ३३ | भांईदर (पूर्व) एम्स जंक्शन ते आरक्षण क्र. २३१ मार्केट पर्यंत (सिध्दीविनायक टॉवर) रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारे बांधणे. | रु. ६५,३८,७००/- |
| ३४ | भांईदर (पूर्व) हिताक्षी हाईट्स ते रामदवेपार्क मुख्य रस्त्याची दोन्ही बाजूुस गटार बांधणे. | रु. ३३,२६,४५०/- |
| ३५ | भांईदर (पूर्व) ऑरेंज हॉस्पीटल रस्त्यावरील महावीर पॅलेस ते रामअनुज व रामदेवपार्क मुख्य रस्त्यापर्यंत दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ७५,८६,३५०/- |
| ३६ | मिरारोड (पूर्व) शिवार गार्डन समोरील बाजू ते सरदार पटेल शाळा पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे. | रु. ४९,९१,०५०/- |
| ३७ | मिरारोड (पूर्व) कनकिया प्रथमेश हेरीटेज ते सालासर आंगण इमारतीपर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ६९,२५,४००/- |
| ३८ | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता शालोम गार्डन व एस.टी.पी. मधील रस्त्यालगत गटार बांधणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| ३९ | मिरारोड (पूर्व) आर.बी.के. शाळेसमोरील रस्त्यालगत गटारे बांधुन स्लॅब टाकणे | रु. ४९,९९,८००/- |
| ४० | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते सुंदर सागर इमारतीपर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. २७,२९,५००/- |
| ४१ | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्त्यावरील निळकंठ टॉवर ते एस.के. स्टोन रस्त्यापर्यंत दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ३८,४९,५००/- |
| ४२ | मिरारोड (पूर्व) पुनम गार्डन येथील एस.के. स्टोन रस्ता ते साई सरस्वती धाम इमारती पर्यंत रस्त्यावर गटारे बांधणे. | रु. ३९,०१,८००/- |
| ४३ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क येथील साई सत्संग ते रामदेव पार्क मुख्य रस्त्यापर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. १४,९१,६००/- |
| ४४ | काशिगांव येथील झंकार कंपनी ते पुजा पार्क पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३५,५४,८००/- |
| ४५ | हटकेश मंगल नगर जंक्शन ते १५ नंबर बस स्टॉप पर्यंत रस्त्याच्या डाव्याबाजूस गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. २४,९३,७००/- |
| ४६ | हटकेश येथील शांतीवन, गंगा सदन व ऑकोर्ड क्रिस्टल, महेश इंड. पर्यंत रस्त्यालगत गटारे बांधणे. | रु. ४९,४२,७००/- |
| ४७ | कनकिया येथील महापौर निवास रस्त्यावरील उर्वरीत ठिकाणी गटारे बांधणे. | रु. ४९,८७,६५०/- |
| ४८ | काशिगांव सिल्व्हर सरीता कॉपलेक्स रस्त्यालगत गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३९,४६,७००/- |
| ४९ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता दुर्गा रेसीडेन्सी ते रामवाटीका पर्यंत रस्ता तयार करणे. | रु. ७३,४१,६५०/- |
| ५० | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता, ऑस्तवाल हाईट्स ते संतहोम शाळेपर्यंत रस्ता तयार करणे. | रु. १,०८,६७,३००/- |

| | | |
|---|---|---|
| ५१ | हटकेश येथील हटकेश जंक्शन ते मंगलनगर गौरव रिजेन्सी पर्यंत रस्ता तयार करणे. | रु. ८३,३५,९००/- |
| ५२ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज-६ एम्स जंक्शन ते आरक्षण २३१, मार्केट लगतचा रस्ता तयार करणे. | रु. ८२,४८,८५०/- |
| ५३ | भाईंदर (पूर्व) हिताक्षी हाईट्स ते रामदेव पार्क मुख्य रस्ता (आरक्षण क्र. २३१ लगत) रस्ता तयार करणे. | रु. ४५,८२,७००/- |
| ५४ | भाईंदर (पूर्व) रस्त्यावर महावीर पॅलेस ते राम अनुज ते रामदेव पार्क मुख्य रस्त्यापर्यंत रस्ता तयार करणे. | रु. ७०,३३,६००/- |
| ५५ | मिरारोड (पूर्व) मेरी गोल्ड १ व २ ते मंगलनगर पर्यंत रस्त्यालगत गटारे बांधुन रस्ता तयार करणे. | रु. २,२०,७९,६५०/- |
| ५६ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क श्वेता रेसीडेन्सी ते कनकिया पाण्याची टाकी पर्यंत रस्ता तयार करणे रस्यालगत गटारे बांधणे. | रु. २,२१,२१,७५०/- |
| ५७ | काशिगांव येथील विनय नगर ते रामंदीर कॉम्पलेक्स पर्यंत विकास सोनम रस्ता तयार करणे गटारे बांधणे. | रु. २,०९,३७,८००/- |
| ५८ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स रस्ता रॉडस्टोन ते एस.टी.पी. पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. ४,३६,८०,४००/- |
| ५९ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स समोरील स्प्रींग रोझ ते मेरी गोल्ड पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व दोन्ही बाजूस गटारे बांधणे. | रु. २,०३,४३,४००/- |
| ६० | रा.म.क्र. ०८ वर सम्राट हॉटेल ते पांडुरंगवाडी पर्यतचा रस्ता व गटार बांधणे. | रु. ३,३०,१४,७३०/- |
| ६१ | रा.म.क्र ०८ काशीमिरा ऑक्ट्रोय नाका ते डॉन बॉस्को शाळा पर्यतचा रस्ता. | रु. १.५० कोटी |
| ६२ | रा.म.क्र ०८ महाजनवाडी ते साई पॅलेस हॉटेल पर्यत विकास आराखडा रस्ता व गटर बांधणे. | रु. २९,४६,८५,६००/- |
| ६३ | तसेच शहरातील इतर विकास कामे करणे. | - |

**(पाणी पुरवठा विभाग)**

| अ.क्र. | कामाचे नाव | मुळ मान्यता | सुधारित मान्यता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका दहिसर चेकनाका गेट ते सम्राट हॉटेलपर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. ४५,६५,५४५/- | रु. ७६,०७,४५७/- | मंजुर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १७.०० टक्के जास्त दराची व मुळ अंदाजपत्रकाच्या लांबीमध्ये ८० मिटर वाढ |
| २ | गायमुख ते चेणेदरम्यान एच.डी.डी. पध्दतीने १६०० मि.मी. व्यासाच्या १८ मि.मी. जाडीच्या पाईपमधून १३५० मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी गायमुख ठाणे जकात नाक्याजवळ घोडबंदर रस्ता छेदून टाकणे. | रु. ४९,८०,९३०/- | रु. ७३,६३,८७९/- | एम. एस. आर. डी. सी. यांनी प्रत्यक्ष कामाच्या वेळी दिलेल्या मान्यतेनुसार लांबीमध्ये वाढ झालेली आहे. |
| ३ | मिरारोड (पुर्व) शांतीनगर सेक्टर २ येथे उंच जलकुंभ बांधणे. | रु.१,१९,४७,३००/- | रु.१,४२,५४,८६९/- | सन २०१३-१४ नुसार केले होते. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ४ | लोढा कॉम्पलेक्स ते एम.आय.डी.सी. जलकुंभापर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. ४५,११,१००/- | रु. ५०,९१,२२७/- | मंजुर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १२.८६ टक्के जास्त दराची आहे. |

तरी वरील काम तातडीने करणे गरजेचे असल्याने कामास सुधारित आर्थिक व प्रशासकीय मान्यता ही सभा देत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ९७ :-**

सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ ''अ'' + ''क'' + ''अग्निशमन'' + ''अंध व अपंग'' + ''महिला व बालकल्याण'' + ''JNNURM'' + ''P'' अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१५ (दि. ११/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा) नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १७४, ठराव क्र. १६३)

**ठराव क्र. ८६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१४-१५ सुधारित व सन २०१५-१६ चे मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी ''आदर्श वार्ड'' योजना यासाठी रु. १० कोटी तसेच आयुक्त / महापौर निवास नुतनीकरणासाठी रु. १ कोटी तरतूद कराचे वाढीव उत्पन्नातुन करण्यात यावी तसेच सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे दुरुस्त्या व सुधारणांसह सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. विशेष महासभा मंजुरी देत आहे.

**सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाज व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक (आकडे लाखात)**

| तपशिल | 2014-15 (सुधारित अंदाज) | 2015-16 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ''अ'' + ''क'' + ''अग्निशमन'' + ''महिला व बालकल्याण'' + ''अंध व अपंग'' + ''JNNURM''+ ''P''= एकूण जमा | 100727.86 | 155170.64 |
| अंदाजपत्रक ''अ'' + ''क'' + ''अग्निशमन'' + ''महिला व बालकल्याण'' + ''अंध व अपंग'' + ''JNNURM''+ ''P''= एकूण खर्च | 83066.59 | 155149.44 |
| अखेरची शिल्लक | 17661.27 | 21.20 |

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- सौ. निलम ढवण**

प्रभाग समिती निधी व नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत नगरसेविका / नगरसेवक हे त्याचे प्रभागाव्यतिरिक्त इतर प्रभागात संबंधित नगरसेवकांच्या लेखी सहमतीने कामे करु शकतील. तसेच सर्व नगरसेवक / नगरसेविका यांनी सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर त्यांना देण्यात आलेला नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधीतून काही कारणामुळे कामे झाली नसल्यास त्यांना त्यावेळेस देण्यात आलेल्या तरतूदीतील प्रलंबित कामे व सन २०१५-१६ च्या वर्षातील तरतूदीतील कामांची यादी बांधकाम विभागाकडे ३० एप्रिल २०१५ पर्यंत देण्यात यावी. बांधकाम विभागाने नगरसेवक / स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधीतील अशा सर्व कामांची नगरसेवक निहाय एकच अंदाजपत्रक तयार करुन मान्यता घेऊन निविदा मागवावी. प्रभाग समिती निधीतील कामे प्रभाग समितीकडून मंजूर करुन घ्यावीत. जेणेकरुन सर्व कामे मुदतीत पूर्ण होऊन यापुढे स्पील ओव्हर राहणार नाही व नगरसेवकांची देखील याबाबत तक्रार राहणार नाही. सर्व नगरसेवक / नगरसेविका यांनी ३० एप्रिल २०१५ पर्यंत नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधीतील कामांचे एकत्रित प्रस्ताव देण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन सदर निधीतून पुरेशी तरतूद करता येईल. मुदतीत प्रस्ताव न दिल्यास खर्च पडणार नाही.

तसेच सन २०१५-१६ या वर्षापासून सन्माननीय नगरसेवक / नगरसेविका यांना सर्व स्टेशनरी, दुरध्वनी, भ्रमणध्वनी बिल व इतर यासाठी महिना रु. २५००/- रक्कम मानधनासमवेत देण्यात यावे.

**सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पातून करावयाची कामे**
**(सार्वजनिक बांधकाम विभाग)**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | सर्व कार्यालये /आयुक्त / महापौर कार्यालय / निवास, सभागृह, फर्निचर व इतर सुविधा उपलब्ध करणे. | रु. १.०० कोटी |
| २ | भाईंदर (पूर्व) केबिन रोड आरोग्य केंद पहीला माळा बांधणे. | रु. ७०.०० लक्ष |
| ३ | भाईंदर (पूर्व) आ. क्र २४१ कम्युनिटी सेंटर बांधणे. | रु. ५.०० कोटी |
| ४ | आ.क्र. १०८ मार्केट बांधणे. | रु. ३.०० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ५ | मनपा क्षेत्र Wifi करणे. | रु. १.०० कोटी |
| ६ | मोर्वा तलाव बांधणे. | रु. २.०० कोटी |
| ७ | पेणकर पाडा साईदत्त तलाव पुर्नाबंधणी करणे. | रु. २.०० कोटी |
| ८ | मनपा क्षेत्रात नव्याने अभ्यासिका E- Library तयार करणे. | रु. १.०० कोटी |
| ९ | भाईंदर (प.) रेल्वे समांतर रस्ता मिरारोड स्टेशनकडे जाणारा तयार करणे. | रु. ५.०० कोटी |
| १० | भाईंदर (प.) गणेशदेवल नगर, आरोग्य केंद्र / बांधणे. | रु. ७५.०० लक्ष |
| ११ | भाईंदर (प.) चर्च ते गणेश देवल नगर पाठीमागील रस्ता तयार करणे. | रु. १.०० कोटी |
| १२ | भाईंदर (प) सुभाषचंद्र बोस मैदान मातीभराव, कुंपण भिंत व इतर आवश्यक कामे करणे. | रु. १.०० कोटी |
| १३ | भाईंदर (प.) विसर्जन धक्का (नविन जागा) | रु. १.५० कोटी |
| १४ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण करणे. | रु. १.५० कोटी |
| १५ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग सर्व्हीस रस्ते सुशोभिकरण काम इतर आवश्यक कामे करणे. | रु. ७.०० कोटी |
| १६ | मिरारोड (पूर्व) आ.क्र २६४ कार्यालय इमारत बांधणे. | रु. ३.०० कोटी |
| १७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र १२२,१७८,१९६,२२१,२१४, ११७,१२२सी,२३०,२३५,२४२,३००,२४८,२६९,२४६,२५४,२९९,३६५,३५५, ३७१ उदयाने मैदाने विकसीत करणे. | रु. १६.०० कोटी |
| १८ | पेणकरपाडा स्मशान समोरील मैदान विकसीत करणे. | रु. ५०.०० लक्ष |
| १९ | नवघर इंदीरानगर शौचालय बांधणे. | रु. ५०.०० लक्ष |
| २० | मनपा क्षेत्रातील अ) शौचालये, सार्व इमारती शाळा इमारती , मैदाने, उदयाने, तलाव, नाले, गटारे, फूटपाथ, स्मशानभुमी इ. मधील दुरुस्ती करणे.<br>ब) रस्ते देखभाल दुरुस्ती कामे | रु. ४.०० कोटी<br>रु. ३५.०० कोटी |
| २१ | रेन्टल हाऊसिंग योजनेतुन विविध विकासकामाची कामे करणे. | रु. १६.०० कोटी |
| २२ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.१२१ वाचनालय बांधणे. | रु. १.५० कोटी |
| २३ | भाईंदर (पूर्व) गोडदेव, भाईंदर (प.) स्मशानभुमी विकसीत करणे | रु. २.०० कोटी |
| २४ | मिरारोड आ.क्र १८४ पार्कीग विकसीत करणे | रु. १०.०० कोटी |
| २५ | भाईंदर (पूर्व) मनसा अपार्ट ते तिरूपती वंदना इमारतीपर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. १०,७५,९५०/- |
| २६ | भाईंदर (पूर्व) शितल कॉम्पलेक्स ते रमेश अपार्टमेंट पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. २९,०६,३५०/- |
| २७ | भाईंदर (पूर्व) क्रिष्णा गीता इमारत ते मुनिष पेटल रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ४२,६२,१५०/- |
| २८ | भाईंदर (पूर्व) क्रिष्णा पालखी ते रामदेव हाईट्स पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| २९ | भंाईंदर (पूर्व) तपोवन विद्यालय ते राम वाटीका पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३७,७९,९००/- |
| ३० | भंाईंदर (पूर्व) राज वैभव ते शुभम हाईट्स रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार | रु. ६०,६७,१००/- |

| | | |
|---|---|---|
| | बांधुन स्लॅब टाकणे. | |
| ३१ | भाईंदर (पूर्व) मथुरा अपार्ट ते आर.बी. के. ग्लोबल स्कुल रस्त्याच्या दोन्ही बाजुस गटार बांधणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| ३२ | भाईंदर (पूर्व) आर.बी.के. ग्लोबल स्कुल ते एम्स जंक्शन पर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| ३३ | भाईंदर (पूर्व) एम्स जंक्शन ते आरक्षण क्र. २३१ मार्केट पर्यंत (सिध्दीविनायक टॉवर) रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारे बांधणे. | रु. ६५,३८,७००/- |
| ३४ | भाईंदर (पूर्व) हिताक्षी हाईट्स ते रामदवेपार्क मुख्य रस्त्याची दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ३३,२६,४५०/- |
| ३५ | भाईंदर (पूर्व) ऑरेंज हॉस्पीटल रस्त्यावरील महावीर पॅलेस ते रामअनुज व रामदेवपार्क मुख्य रस्त्यापर्यंत दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ७५,८६,३५०/- |
| ३६ | मिरारोड (पूर्व) शिवार गार्डन समोरील बाजू ते सरदार पटेल शाळा पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे. | रु. ४९,९१,०५०/- |
| ३७ | मिरारोड (पूर्व) कनकिया प्रथमेश हेरीटेज ते सालासर आंगण इमारतीपर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ६९,२५,४००/- |
| ३८ | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता शालोम गार्डन व एस.टी.पी. मधील रस्त्यालगत गटार बांधणे. | रु. ३७,९०,५५०/- |
| ३९ | मिरारोड (पूर्व) आर.बी.के. शाळेसमोरील रस्त्यालगत गटारे बांधुन स्लॅब टाकणे | रु. ४९,९९,८००/- |
| ४० | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते सुंदर सागर इमारतीपर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. २७,२९,५००/- |
| ४१ | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्त्यावरील निळकंठ टॉवर ते एस.के. स्टोन रस्त्यापर्यंत दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ३८,४९,५००/- |
| ४२ | मिरारोड (पूर्व) पुनम गार्डन येथील एस.के. स्टोन रस्ता ते साई सरस्वती धाम इमारती पर्यंत रस्त्यावर गटारे बांधणे. | रु. ३९,०१,८००/- |
| ४३ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क येथील साई सत्संग ते रामदेव पार्क मुख्य रस्त्यापर्यंत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. १४,९१,६००/- |
| ४४ | काशिगांव येथील झंकार कंपनी ते पुजा पार्क पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३५,५४,८००/- |
| ४५ | हटकेश मंगल नगर जंक्शन ते १५ नंबर बस स्टॉप पर्यंत रस्त्याच्या डाव्याबाजूस गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. २४,९३,७००/- |
| ४६ | हटकेश येथील शांतीवन, गंगा सदन व ऑकोर्ड क्रिस्टल, महेश इंड. पर्यंत रस्त्यालगत गटारे बांधणे. | रु. ४९,४२,७००/- |
| ४७ | कनकिया येथील महापौर निवास रस्त्यावरील उर्वरीत ठिकाणी गटारे बांधणे. | रु. ४९,८७,६५०/- |
| ४८ | काशिगांव सिल्व्हर सरीता कॉपलेक्स रस्त्यालगत गटारे बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३९,४६,७००/- |
| ४९ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता दुर्गा रेसीडेन्सी ते रामवाटीका पर्यंत रस्ता तयार करणे. | रु. ७३,४१,६५०/- |
| ५० | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता, ऑस्तवाल हाईट्स ते संतहोम शाळेपर्यंत रस्ता तयार करणे. | रु. १,०८,६७,३००/- |
| ५१ | हटकेश येथील हटकेश जंक्शन ते मंगलनगर गौरव रिजेन्सी पर्यंत रस्ता तयार करणे. | रु. ८३,३५,९००/- |
| ५२ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेज-६ एम्स जंक्शन ते आरक्षण २३१, मार्केट लगतचा रस्ता तयार करणे. | रु. ८२,४८,८५०/- |
| ५३ | भाईंदर (पूर्व) हिताक्षी हाईट्स ते रामदेव पार्क मुख्य रस्ता (आरक्षण क्र. २३१ लगत) रस्ता तयार करणे. | रु. ४५,८२,७००/- |
| ५४ | भाईंदर (पूर्व) रस्त्यावर महावीर पॅलेस ते राम अनुज ते रामदेव पार्क मुख्य रस्त्यापर्यंत रस्ता तयार करणे. | रु. ७०,३३,६००/- |
| ५५ | मिरारोड (पूर्व) मेरी गोल्ड १ व २ ते मंगलनगर पर्यंत रस्त्यालगत गटारे बांधुन रस्ता तयार करणे. | रु. २,२०,७९,६५०/- |
| ५६ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क श्वेता रेसीडेन्सी ते कनकिया पाण्याची टाकी पर्यंत रस्ता तयार करणे रस्यालगत गटारे बांधणे. | रु. २,२१,२१,७५०/- |
| ५७ | काशिगांव येथील विनय नगर ते रामंदीर कॉम्पलेक्स पर्यंत विकास सोनम रस्ता तयार करणे गटारे बांधणे. | रु. २,०९,३७,८००/- |
| ५८ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स रस्ता रॉडस्टोन ते एस.टी.पी. पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. ४,३६,८०,४००/- |

| | | |
|---|---|---|
| ५९ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स समोरील स्प्रींग रोझ ते मेरी गोल्ड पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व दोन्ही बाजूस गटारे बांधणे. | रु. २,०३,४३,४००/- |
| ६० | रा.म.क्र. ०८ वर सम्राट हॉटेल ते पांडुरंगवाडी पर्यतचा रस्ता व गटार बांधणे. | रु. ३,३०,१४,७३०/- |
| ६१ | रा.म.क्र ०८ काशीमिरा ऑक्ट्रोय नाका ते डॉन बॉस्को शाळा पर्यतचा रस्ता. | रु. १.५० कोटी |
| ६२ | रा.म.क्र ०८ महाजनवाडी ते साई पॅलेस हॉटेल पर्यत विकास आराखडा रस्ता व गटर बांधणे. | रु. २९,४६,८५,६००/- |
| ६३ | तसेच शहरातील इतर विकास कामे करणे. | - |

**(पाणी पुरवठा विभाग)**

| अ.क्र. | कामाचे नाव | मुळ मान्यता | सुधारित मान्यता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका दहिसर चेकनाका गेट ते सम्राट हॉटेलपर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. ४५,६५,५४५/- | रु. ७६,०७,४५७/- | मंजुर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १७.०० टक्के जास्त दराची व मुळ अंदाजपत्रकाच्या लांबीमध्ये ८० मिटर वाढ |
| २ | गायमुख ते चेणेदरम्यान एच.डी.डी. पध्दतीने १६०० मि.मी. व्यासाच्या १८ मि.मी. जाडीच्या पाईपमधून १३५० मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी गायमुख ठाणे जकात नाक्याजवळ घोडबंदर रस्ता छेदून टाकणे. | रु. ४९,८०,९३०/- | रु. ७३,६३,८७९/- | एम. एस. आर. डी. सी. यांनी प्रत्यक्ष कामाच्या वेळी दिलेल्या मान्यतेनुसार लांबीमध्ये वाढ झालेली आहे. |
| ३ | मिरारोड (पुर्व) शांतीनगर सेक्टर २ येथे उंच जलकुंभ बांधणे. | रु.१,१९,४७,३००/- | रु.१,४२,५४,८६९/- | सन २०१३-१४ नुसार केले होते. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ४ | लोढा कॉम्पलेक्स ते एम.आय.डी.सी. जलकुंभापर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. ४५,११,१००/- | रु. ५०,९१,२२७/- | मंजुर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १२.८६ टक्के जास्त दराची आहे. |

तरी वरील काम तातडीने करणे गरजेचे असल्याने कामास सुधारित आर्थिक व प्रशासकीय मान्यता ही सभा देत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा संपण्याची वेळ दु. १.१५ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका